# शांति-सेना

१२५५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२९४

विनोबा

REFBK-0009302

परंधाम [redacted]पीठ प्रकाशन

# शांति-सेना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक २८१७० वि: ...
क्रमांक ९२५६ नों. दि: १५५५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३०२

विनोबा

REFBK-0009302

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक :

**भाऊ पानसे**

ग्राम सेवा मंडळ

परंधाम विद्यापीठ

पो. **पवनार** ( वर्धा )

आवृत्ति १ ली : १०,०००

तारीख १० नोव्हेंबर १९५७

किंमत ३१ नये पैसे

मुद्रक :

**मोहनलाल भट्ट**

राष्ट्रभाषा प्रेस,

हिन्दीनगर, वर्धा

# प्रकाशकीय

मैसूरला २५ ते २७ सप्टेंबरपर्यंत अखिल भारतीय निवेदक शिबीर झालें. तत्पूर्वी एलवाल येथें सर्वपक्षीय नेत्यांची एक ग्रामदान परिषद झाली.

या परिषदेचें निवेदन आणि त्यावर भाष्यरूप असें विनोबांचें मैसूर येथील जाहीर प्रार्थना-प्रवचन या पुस्तिकेंत घेतलें आहे. शिबिरांत शांति-सेनेबाबत विनोबांनीं विस्तृत विवेचन केलें आणि कांहीं शंकांचें समाधान केलें. तीं महत्त्वाचीं भाषणें हि यांत जोडलीं आहेत. आणि शेंवटीं शिबिरांत घेण्यांत आलेले निर्णय जोडले आहेत.

"ग्रामदान ग्रामराज्य आणि शांति-सेना" या आमच्या नुकत्या च प्रकाशित झालेल्या पुस्तिकेंतील "सेवा-सेना आणि शांति-सेना" हें विनोबांचें भाषण विषय-पूर्तीसाठीं म्हणून या पुस्तिकेंत घेतलें आहे.

---

# अनुक्रमणिका

पृष्ठ


| | | |
|---|---|---|
| १ | नेता परिषदेचें निवेदन | १ |
| २ | ग्रामदान चळवळीला द्विविध आशीर्वाद | ४ |
| ३ | सेवा-सेना आणि शांति-सेना | ९ |
| ४ | शांति-सेनेचा सर्वोच्च सेनानी | १३ |
| ५ | सर्वोच्च सेनानीचा अर्थ | ३२ |
| ६ | शांति-सेनेबाबत शंका समाधान | ४३ |

## * नेता परिषदेचें निवेदन : १ :

सामाजिक आणि आर्थिक समस्यांची आणि विशेषत: भूमि-समस्येची सोडवणूक करण्यासाठीं अहिंसक उपाययोजना करण्याचें आपणांस कसें सुचलें या विषयींची माहिती आचार्य विनोबांनीं परिषदेला दिली. भूदानापासून सुरवात होऊन ही चळवळ वाढत वाढत आतां ग्रामदानापर्यंत येऊन पोंचली आहे. अशा रीतीनें तीन हजारांवर गांवें ग्रामदानांत मिळालीं आहेत, त्या गांववाल्यांनीं जमिनीची आपली व्यक्तिगत मालकी ग्राम-समाजाला अर्पण केली आहे.

---

* ( सर्व-सेवा-संघातर्फे आयोजित केलेल्या ग्रामदान-परिषदेची सभा २१, २२ सप्टेंबरला मैसूरपासून दहा मैलावर असलेल्या एलवाल गांवीं झाली. या परिषदेस खालील मंडळी हजर होती.

१. राष्ट्रपति राजेंद्रबाबू
२. श्री. जवाहरलाल नेहरू
३. ,, गोविंदवल्लभ पंत
४. ,, ढेबरभाई
५. ,, मोरारजीभाई
६. ,, गुलझारीलाल नंदा
७. ,, जयप्रकाश नारायण
८. ,, गंगाशरण सिंह
९. श्री. डॉ. अहमद (अजय घोष तर्फे)
१०. श्री.दिवाकरजी
११. ,, प्यारेलालजी
१२. ,, यशवंतराव चव्हाण
१३. ,, सुचेता कृपलानी
१४. ,, श्रीमन् नारायण
१५. ,, एस. के. डे
१६. श्री. कामराज नादर
१७. ,, नंबूद्रीपाद
१८. ,, निजलिंगप्पा
१९. ,, हरेकृष्ण मेहताब
२०. ,, भक्तवत्सलम्
२१. ,, पी. कापडीया
२२. ,, एस्. चेन्नय्या

याशिवाय सर्व-सेवा-संघाचे अध्यक्ष आणि प्रबंधसमितीचे सभासद हि हजर होते. )

परिषदेला आलेल्या मंडळींनीं या ग्रामदान चळवळीचें स्वागत केलें आणि या चळवळीच्या उद्दीष्टाबद्दल आपली संपूर्ण सहानुभूति प्रकट केली. त्यांच्या मतें या चळवळीमुळें सामूहिक जीवनाचें वळण गांवकऱ्यांना लागून गांवांची सर्वांगीण उन्नति होईल आणि त्यांची आर्थिक स्थिति सुधारेल. याशिवाय देशांतील भू-समस्या सोडविण्याच्या दिशेनें आणि देशांत सामूहिक जीवनाचें वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीनें या चळवळीमुळें एक हवा तयार होईल. अहिंसक तंत्राचा अवलंब आणि स्वखुषीचें दान हा या चळवळीचा विशेष म्हटला पाहिजे. स्वावलंबन आणि सहकार या भूमिकेवर समाजाची रचना करून आर्थिक विकास घडवून आणण्याच्या या कार्यक्रमाला अशा रीतीनें एक नैतिक बैठक मिळाली आहे. अशा चळवळीला सर्व प्रकारचें साह्य आणि उत्तेजन मिळणें जरूर आहे.

प्रादेशिक आणि मध्यवर्ति सरकारांत असलेल्यापैकीं जे लोक परिषदेला हजर होते त्यांनीं ग्रामदान चळवळीला अंतःकरणपूर्वक पाठिंबा दिला आणि मदत करण्याची आपली इच्छा हि प्रकट केली. परंतु त्यांच्या मतें सरकारांना या संबंधांत त्यांनीं हातीं घेतलेल्या स्वतःच्या भूमिसुधारणेच्या योजनांची च अंमलबजावणी करावी लागेल. जमिनीबाबत मधल्या दलालांचें उच्चाटन करणें, कमींत कमी किती जमीन राखावी यावर नियंत्रण राखणें, आणि शेतकऱ्यांच्या संमतीनें सहकारी पद्धतीला प्रोत्साहन देणें हा त्या योजनांमागील हेतु आहे. या सरकारी योजना ग्रामदानाच्या चळवळीशीं विसंगत नसून या चळवळीला मदतरूप च आहेत असें त्यांचें म्हणणें पडलें. सामूहिक विकासाच्या सरकारी योजना आणि ग्रामदानाची

चळवळ यांत जास्तींत जास्त सहकार वाढणें जरूर आहे असें हि त्यांनीं सांगितलें.

दोन दिवसांच्या या विचारविनिमयानंतर ही परिषद विनोबाजींच्या कार्याबद्दल, त्या च प्रमाणें राष्ट्रीय आणि सामाजिक समस्या सहकारानें आणि अहिंसात्मक पद्धतीनें सोडविण्याच्या त्यांच्या प्रयत्नाबद्दल आदर व्यक्त करते आणि देशांतील सर्व वर्गांच्या लोकांना विनंति करते कीं त्यांनीं या कार्याला उत्साहपूर्वक पाठिंबा द्यावा.

मैसूर, २२-९-५७

• • •

# ग्रामदान चळवळीला द्विविध आशीर्वाद



[ मैसूर येथील प्रार्थना-प्रवचनांत नेता परिषदेनें काढलेल्या निवेदनाचा अर्थ विनोबांनीं फोड करून सांगितला. २५-९-५७ चें हें भाषण पुढें दिलें आहे.]

तुमच्या या नगरीशीं मी बरा च परिचित आहें. मी येथें अजूनपर्यंत आलों नव्हतों, तथापि मानसिक नेत्रांनीं या नगरीचें दर्शन मीं अनेक वेळां केलें आहे. या नगरीकडे एक सांस्कृतिक नगरी या दृष्टीनें मी पाहत आलों आहें. आणि या वस्तूचा अनुभव या नगरीच्या प्रवेशाबरोबर च मला आला. पुत्तप्पा आपल्या देशांतील एक असे कवि आहेत कीं त्यांच्या तुलनेचा कवि हिंदुस्थानच्या कोणत्या हि भाषेंत आज तरी सांपडायचा नाहीं. आधुनिकतम अशा वैज्ञानिक आणि आध्यात्मिक दृष्टीनें त्यांनीं एका महाकाव्याची रचना केली आहे. त्यांच्या मतें आपल्या देशाचें हें 'एपिक एज' आहे. महाकाव्याच्या निर्मितीसाठीं अनुकूल असें हें युग आहे. त्यांनीं आपला ग्रंथ रामायणावर लिहिलेला असला तरी त्यांचें तें एक नव्य रामायण आहे. त्यांना एक स्वतंत्र दर्शन आहे. अशा कवींच्या दर्शनाचा आणि त्यांच्या घरीं जाऊन येण्याचा योग आल्याबद्दल मला फार आनंद झाला. आम्हीं जें सर्वोदयाचें काम आरंभिलें आहे त्याला त्यांची परिपूर्ण सहानुभूति असल्याचें मला दिसून आलें. प्राचीन महाभक्त हनुमान या प्रांतांत आमच्या मदतीला तयार आहे हें तर मीं मानलें च होतें, परंतु आधुनिक वाल्मिकीची मदत हि आम्हांला आहे हें पाहून मला फार आनंद झाला. अशा रीतीनें प्राचीन आणि आधुनिक असे दोन्ही आशीर्वाद आमच्या कामाला मिळाले आहेत.

नुकती च जी ग्रामदान परिषद येलवाल येथें झाली तींत देखील हे दोन्ही आशीर्वाद आम्हांला मिळाले आहेत. वेगवेगळचा विचारसरणीचे पुढारी त्या परिषदेला आले होते आणि दोन दिवस विचार विनिमय करून त्यांनीं एक संहिता आपल्या देशापुढें ठेवली आहे. त्या संहितेंतील दोन शब्द आम्हांला द्विविध आशीर्वादाच्या स्वरूपाचे आहेत. त्या संहितेंत असें म्हटलें आहे कीं "विनोबांनीं सामाजिक समस्या सोडविण्यासाठीं जी अहिंसक आणि सहयोगी पद्धति अंमलांत आणली आहे ती आम्हां सर्वांना मान्य आहे." आमच्या चळवळींत त्यांना दोन गोष्टी आढळल्या. एक म्हणजे ही चळवळ अहिंसक आहे. हा झाला प्राचीन आशीर्वाद. आणि दुसरी गोष्ट ही कीं, ही चळवळ सहकारितेच्या भूमिकेवर आहे. (कोऑपरेटिव्ह मेथड) हा झाला आधुनिक आशीर्वाद. असा दुहेरी आशीर्वाद या संहितेंत आहे.

आतां याचा अर्थ काय होतो तें नीट समजून घ्या. आत्म्याच्या एकतेचा अनुभव हा अहिंसात्मक पद्धतीचा आधार आहे. म्हणजे हा आध्यात्मिक विचार झाला. आणि सहयोगी पद्धतीचा आधार विज्ञान आहे. अशा रीतीनें आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दोन्ही पद्धतींचा योग सर्वोदयांत झाला अहे याची आपल्या नेत्यांना ओळख पटली आहे. गेलीं साडे सहा वर्षें आम्हीं ही जी चळवळ चालविली तिचें सर्वोत्तम फळ या निवेदनाच्या रूपानें आम्हांला मिळालें असें मी समजतों.

कांहीं लोकांना वाटे कीं सर्वोदय म्हणजे जीर्ण, पुराण विचार. विज्ञानाच्या नवनवीन शोधांची या सर्वोदयवाल्यांना कांहीं

किंमत वाटत नाहीं असें त्यांना वाटे. हे लोक मिलपेक्षां चरखा चांगला म्हणणार, चरख्यापेक्षां तकली चांगली असें म्हणणार, लोखंडी तकलीपेक्षां लांकडी तकली चांगली असें यांना वाटणार, आणि लांकडी तकलीऐवजीं केवळ हातानें च कोणीं सूत कांतलें तर यांना अधिक च आवडेल; अशी सर्वोदयवादी लोकांबद्दल कांहीं मंडळींची कल्पना झाली होती. आतां नेत्यांच्या लक्षांत आलेलें दिसतें कीं सर्वोदयांत विज्ञान हि आहे. ग्रामदानाच्या चळवळींतील आध्यात्मिकतेबाबत कोणाला शंका नव्हती च. शंका होती वैज्ञानिकतेबाबत. परंतु आतां दोन्हीबाबत निःशंकता झाली आणि पुढाऱ्यांचा आशीर्वाद या चळवळीला मिळाला.

वैज्ञानिकतेच्या अभावीं अहिंसात्मक योजना कशी असते याचें मी एक उदाहरण देतों. चीनमध्यें लाओत्से नांवाचा एक तत्त्वज्ञानी होऊन गेला. त्यानें आदर्श गांवाची कल्पना मांडली आहे. गांव सर्व दृष्टीनें स्वावलंबी आहे, बाहेरून खास कांहीं वस्तु आणाव्या लागत नाहींत, अशा रीतीनें सर्व प्रकारें गांव संतुष्ट आहे. आणि शेजारीं एखादें गांव असलें पाहिजे हें हि त्यांना माहीत असतें. तें कशावरून ? रात्रीं दुरून कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज ऐकूं येत असल्यामुळें शेजारीं गांव जरूर असलें पाहिजे असें हे गांववाले अनुमान करतात. म्हणजे प्रत्येक गांव जरी सर्व प्रकारें स्वावलंबी आणि संतुष्ट असलें तरी एक गांव दुसऱ्या गांवाची विचारपूस करणार नाहीं कीं या गांवचे लोक दुसऱ्या गांवच्या लोकांना भेटायला हि जाणार नाहींत. वैज्ञानिकतेच्या अभावीं अहिंसात्मक योजना कशी असते याचा हा नमूना झाला.

आतां आध्यात्मिकतेच्या अभावीं केवळ वैज्ञानिक योजना कशी असते तें पहायचें असेल तर रशियांत जावें लागेल. सगळी शेती एकत्र करण्यांत आली आहे. कोणाच्या पसंती नापसंतीबद्दल कोणाला विचारण्याचा प्रश्न च नाहीं. शेत केवढें मोठें असावें याबद्दल कोणी बैलांना विचारतो का ? शेतांत काय पेरायचें हें हि त्याला विचारायचें नसतें. त्याच्याकडून फक्त काम घ्यायचें. जी काय योजना बनेल तींत काम करणें एवढा च बैलांचा धर्म. आणि योजना करणारांना जर विचारलें कीं "अरे व्यवस्थापकांनो, बैलांचा धर्म तुम्हीं सांगितला, पण तुमचा तरी कांहीं धर्म आहे कीं नाहीं ?" तर ते उत्तर देतील, "होय, आमचा धर्म आम्हांला माहीत आहे. बैलांना पोटभर खायला दिलें पाहिजे हा आमचा धर्म आहे." योजना सरकार बनवील, तिच्या बाबतींत कोणाला कांहीं बोलण्याचें काम नाहीं. खाण्यापिण्याबाबत कोणाची कांहीं तक्रार राहणार नाहीं, एवढें सरकार पाहील. बाकी जी योजना बनेल त्याप्रमाणें प्रत्येकाला काम करावें लागेल. हा आहे रशियाचा साम्यवाद. आध्यात्मिकतेच्या अभावीं वैज्ञानिक योजनेचा हा नमूना.

अशा रीतीनें लाओत्सेवाली केवळ अहिंसात्मक योजना आणि स्टालीनची केवळ वैज्ञानिक योजना, अशा दोन योजनांचीं उदाहरणें मीं तुमच्या समोर मांडलीं. पहिली आहे 'नॉन व्हायोलंट' योजना आणि दुसरी आहे 'कोऑपरेटिव्ह' योजना.

परंतु सर्वोदयाची योजना काय आहे ? आमच्या नेत्यांनीं संहितेमध्यें सर्वोदयाच्या योजनेला "नॉन व्हायोलंट कोऑपरेटिव्ह

मेथड" असें संबोधलें आहे. ("अहिंसात्मक सहयोगी पद्धति.") हीं दोन विशेषणें आपण नीट लक्षांत ठेवलीं पाहिजेत. यापैकीं एक विशेषण जरी लंगडें पडलें तरी सर्वोदय योजना धोक्यांत येईल.

गेलीं सहा वर्षें मी हें च सांगत आलों आहें. खेडेगांवच्या लोकांनीं प्रेमपूर्वक स्वतंत्र इच्छेनें जर ग्रामदान केलें तर ती सर्वोत्तम बचावाची योजना (डिफेन्स मेझर) होईल असें मी म्हणत आलों आहें. एखादें जर जागतिक युद्ध उद्भवलें तर ही पंचवर्षीय योजना सगळीच्या सगळी कोलमडून पडेल. कारण ती देशाच्या आयात-निर्यातीवर बव्हंशीं अवलंबून आहे. युद्ध सुरूं झालें तर सारी आयात निर्यात थांबेल, अन्न धान्याचे भाव भरमसाट वाढतील, आणि देशाचें जीवन संकटांत येईल. अशा वेळीं देशाला कोण वांचवील ? माझें निश्चित मत आहे कीं, ग्रामदानाच्या या अहिंसात्मक सहयोगी पद्धतींत च राष्ट्राचा बचाव आहे.

● ● ●

आजारपणांत मनुष्याची चिंतनशक्ति दुर्बल होते असें सामान्यत: मानलें जातें. परंतु मला उलटा च अनुभव आला. या महिन्यांत मी खूप च आजारी झालों. शरिराबद्दल भरंवसा पूर्वींपासून च मानलेला नव्हता, पण आतां ती जाणीव विशेष होत आहे. तथापि चिंतनाची शक्ति मीं बरी च अनुभवली.

या आजारपणांत जो मुख्य विचार सारखा मनांत घोळत राहिला तो शांति-सेनेबाबतचा होय. सरकार ही वस्तु नाहींशीं झाली पाहिजे असें मी वारंवार सांगत आलों. तो जणूं मंत्र च बनला आहे. परंतु सरकार नष्ट व्हायचें म्हणजे काय, तें नीट समजून घेतलें पाहिजे. लोकांनीं स्वत:चें रक्षण स्वत: च करायला शिकलें पाहिजे. लोक-कार्यांत संरक्षण ही मोठी वस्तु असते. संरक्षण खातें नीट सांभाळलें गेलें नाहीं तर लोक अनाथ बनतील. म्हणून देशाची रक्षण-शक्ति प्रत्येक स्थानांत असली पाहिजे. या रक्षण-शक्तीला च मी शांति-सेना म्हणतों.

हिंसक-सेना आणि शांति-सेना यांत पुष्कळ फरक आहे. कवायत, शिस्त इत्यादि बाबतींत या दोन सेनांचें साम्य असलें तरी मुख्य बाबतींत फार भिन्नता आहे. हिंसक-सेना, ज्या ठिकाणीं तिचा मुळीं च परिचय नसतो अशा ठिकाणीं अधिक चांगल्या प्रकारें काम करूं शकते. कारण तेथें गोळी चालविण्याचा प्रश्न असतो. अशा वेळीं परिचय नसण्यानें कार्य चांगलें साधतें.

उलट अहिंसक म्हणजे च शांति-सेना परिचयाच्या क्षेत्रांत च अधिक चांगलें काम करूं शकते. ज्या माणसानें एखाद्या क्षेत्रांत

खोल सेवा केली असेल तो माणूस त्या ठिकाणचा उत्तम शांति-सैनिक बनूं शकतो. हिंदुस्थानचा एखादा माणूस उठेल आणि फ्रान्समधें शांति-सेनेचें काम करूं म्हणेल तर तें जमणार नाहीं. हां, एखादा व्यासभगवानासारखा नैतिक शक्तीचा पुरूष असेल तर गोष्ट वेगळी. एरवीं स्थानिक सेवक च स्थानिक क्षेत्रांत शांति-सेनेचें काम करूं शकतील.

शांति-सेनेचें काम निसर्गोपचारासारखें असतें. रोग होणार च नाहीं, या गोष्टीकडे प्राकृतिक चिकित्सा अधिक ध्यान देते. इतक्या ऊपर रोग झाला च तर शरीरशुद्धीच्या द्वारें तो बरा करण्याचा प्रयत्न असतो. त्याप्रमाणें अशांतता उत्पन्न च होणार नाहीं असा प्रयत्न करणें हें शांति-सेनेचें काम आहे. इतक्या ऊपर अशांति माजली तर त्या ठिकाणीं स्वतःचें बलिदान करणें हें शांति-सैनिकाचें कर्तव्य ठरतें. म्हणून शांति-सेनेचें नित्यकार्य सेवा-सेनेच्या स्वरूपाचें राहील आणि विशेष प्रसंगीं ती शांति-सेनेचें काम करील.

आळी-आळींतून आमचे सेवक ग्रामदान, साहित्य-प्रचार, सफाई, रुग्ण-सेवा इत्यादि विविध सेवेचीं कामें करतील. लोकांचा या सेवकांवर विश्वास असेल. अडचणीच्या वेळीं आपण बोलावलें तर हा मदतीला येईल, अशी लोकांना खात्री वाटली पाहिजे. एखाद्या म्हातारीचा मुलगा आजारी असेल आणि तिनें या सेवकाला रात्रीं जागायला बोलावलें तर तो आनंदानें जाईल आणि रात्रभर जागून सेवा करील. असे सहृदय आणि सदा सर्वदा सेवेला तत्पर आपले शांति-सैनिक असतील. अशा सैनिकांचें ज्ञान वाढविण्यासाठीं मधून मधून रिफ्रेशर कोर्सेस घेतले जावेत,

२८९८० ... दि.

सेवा-कार्य उत्तम प्रकारें कसें करतां येईल याचें ज्ञान अशा कोर्सेसमधून त्यांना मिळावें.

सर्व-पक्ष-मुक्त आणि सदा सेवेला तत्पर अशा सेवकांची ही कल्पना तशी नवीन नाहीं. कांहीं लोक पक्षापासून मुक्त असले तरी ते विशिष्ट सेवा करणारे असतात. परंतु हा सेवक सर्व प्रकारची सेवा करणारा असेल. गाढवावर कोणीं किती हि ओझें लादावें. तो तक्रार करणार नाहीं. तसा आमचा शांति-सैनिक असेल.

केरळमधें असे एक हजार सेवक तयार करायचे आहेत. त्यांच्यासाठीं शिक्षणाची योजना करावयाची आहे. त्यांच्या योगक्षेमाची हि योजना करायची आहे. भूदान, ग्रामदान, हें काम तर ते करतील च, परंतु त्या पुढचें हि काम त्यांना करायचें आहे. हे सैनिक शहराशीं हि संबंध राखतील. सामान्यत: शहरांतून च अधिक दंगेधोपे होतात. आमची कल्पना, आमचे विचार, शहरांतील लोकांपर्यंत पोंचत च नाहींत. ग्रामसेवक हा मुख्यत: गांवाची सेवा करील हें खरें असले तरी त्याला शहराची उपेक्षा करून चालायचें नाहीं. शहरांतून संपत्तिदान आणि साहित्य-प्रचार हीं कामें विशेष होऊं शकतात. शहरांतील संपत्ति-दानाचा विनियोग थोडा शहरांत होईल च, परंतु अधिक खेड्यांत होईल. शहरांत सेवा करण्यासाठीं कॉलेजचे विद्यार्थी हि मिळूं शकतात. गांवांतून सर्वोदय-मंडळें आणि मित्र-मंडळें स्थापन होतील. संपत्तिदाते, मित्र-मंडळें, आणि सर्वोदय-मंडळें, या तिघांनीं एकत्र येऊन काम केलें पाहिजे. मुख्य मुख्य शहरें आपल्या ताब्यांत असलीं पाहिजेत. शांति-सेनेच्या सेवकांची सेवा-शक्ति वाढेल आणि व्यापक होईल या दृष्टीनें जोर लावायला हवा.

या शांति-सेनेची मुख्य शक्ति कोणती ? जनतेची संमति हें या सेनेचें मुख्य बळ होय. संपत्तिदान अनेकांनीं दिलें आहे. याचा अर्थ इतका च कीं त्या त्या लोकांची संमति आमच्या कामाला मिळाली. परंतु आपल्याला प्रत्येकाकडून संमति मिळविली पाहिजे. सरकारी कामासाठीं आणि सैनिकांसाठीं जो कर वसूल करण्यांत येतो तो अगदीं बालापासून तों वृद्धापर्यंत वसूल करण्यांत येतो. प्रत्येकजण कापड वापरतो, त्या कापडावर कर आहे. चालला पैसा सरकारकडे. आपण पोस्टाचीं कार्डें वापरतों, रेल्वेनें प्रवास करतों, या सगळ्यांतून सरकारला पैसा मिळत असतो. अशा रीतीनें सरकारला प्रत्येक माणसाची संमति मिळत असते.

शांति-सेना प्रभावी व्हायची असेल तर जनतेंतील प्रत्येक व्यक्तीकडून अशी संमति तिला मिळाली पाहिजे. प्रत्येक घरांतून 'संमतिदान' मिळावें अशी माझी इच्छा आहे. शांति-सेनेचें प्रत्यक्ष कार्य संपत्तिदानाच्या आधारें चालेल. परंतु शांति-सेनेचें खरें बळ 'संमतिदानांत' आहे. यासाठीं मीं अशी सूचना केली आहे कीं दर महिन्याकाठीं पांच माणसांच्या एका कुटुंबांतून स्वत: कांतलेल्या सुताची एक गुंडी मिळावी. या गुंडीची किंमत वीस नये पैसे असेल. म्हणजे प्रत्येक व्यक्तीकडून चार नये पैसे दर महिन्यास मिळतील. हें मीं पैशाच्या भाषेंत मांडलें तरी मला पैसे नकोत, श्रम हवा आहे. असा श्रम प्रत्येक कुटुंबांतून मिळूं लागला तर एक फार मोठी क्रांति होईल. प्रत्येक घरांत उत्पादन वाढेल. एखादा म्हातारा किंवा आजारी माणूस देखील एक गुंडी महिन्याची देऊं शकेल. या एका गुंडीनें शांति-सेनेला आर्थिक मदत फारशी मिळेल असें नाहीं. आर्थिक मदत तर संपत्ति-दानानें च मिळेल. परंतु नैतिक बळ या 'संमति-दाना' नें मिळेल.

• • •

# शांति-सेनेचा सर्वोच्च सेनानी



[ मैसूर शिबिरांतील भाषण. सकाळ २६–९–५७ ]

भूदानाच्या विकासाचा क्रम तुम्ही जाणतां च. ग्रामराज्याची कल्पना निरनिराळ्या तऱ्हेनें आंध्रमधें मांडण्याचा मीं प्रयत्न केला परंतु तिथें ती वस्तु जमली नाहीं. पुढें तामिलनाडमधें ग्रामदानाची बाब समजावली. तिथें ग्रामदान मिळणार नाहीं असें अनेकांना वाटलें. तिथें बरें च खणावें लागलें हें खरें. परंतु तिथें हि ग्रामदान मिळालें. तेव्हां मीं तालुकादानाची कल्पना मंडळींपुढें मांडली. कारण एका सघन क्षेत्रांत अनेक ग्रामदानें मिळालीं तर ग्रामराज्याचा पाया तिथें घालतां येईल अशी कल्पना होती. अपेक्षेइतकें तिथें ग्रामराज्याचें काम जरी झालें नाहीं तरी तामिलनाडमधें तो विचार आतां सर्व वर्गाच्या लोकांनीं मान्य केला असल्यामुळें तिथें तें काम वाढेल अशी मला आशा आहे. त्यानंतर केरळमधें प्रवेश झाला. तिथें मला फार जपून वागावें लागलें. माझ्या कांहीं उद्‌गारांमुळें तिथें कांहीं लोक बरे च आशान्वित झाले होते तर त्या च उद्‌गारांमुळें कांहीं लोक भयभीत झाले होते. कम्युनिस्टांच्या आहारीं मी जाईन कीं काय अशी कांहींना शंका वाटूं लागली तर कदाचित् सबंध केरळचें च दान मिळेल असें कांहींना वाटूं लागलें. अशी परस्पर-विरुद्ध भावना जेव्हां जागृत होते तेव्हां फार सावधगिरी बाळगावी लागते. आमच्या कांहीं मित्रांनीं मला सावध राहण्याचा इषारा हि दिला होता. त्या मित्रांना कशामुळें भय वाटलें तें माहीत नाहीं परंतु वाटलें खरें. वास्तविक गांधी विचारांत जी वस्तु मुळीं च वसत नाहीं ती म्हणजे भय. जागरूकता किंवा सावधगिरी त्या विचारांत

आहे परंतु भय मुळीं च नाहीं. परंतु त्या च क्षेत्रांतून भीतीचा सूर निघाला कीं 'सावधान!' मीं म्हटलें, मी चांगला च सावध आहें. समोरच्या बाजूनें कांहीं धोका आहे म्हणून नव्हे तर माझ्या शरीराच्या च बाजूनें धोका वाटत आहे म्हणून. कारण शरीर आतां इतकें थकलें आहे कीं एखाद्या दिवशीं त्यानें संप केला तर आश्चर्य नाहीं. आणि तसा प्रसंग एकदां आला हि. १५० इंच पाऊस जिथें पडतो त्या प्रदेशांतून माझी यात्रा चालू होती. चारी बाजूला इन्फ्लुएन्झाचा जोर होता. आणि शरीरानें संप केला. व्याख्यान देणें हि शक्य झालें नाहीं. कारण यमदूतानें गळा पकडला होता. खोकला झाला. परंतु मीं यात्रा बंद केली नाहीं. चार दिवस मी मोटारींतून गेलों. माझ्या बरोबरच्या लोकांनीं व्याख्यानें दिलीं.

परंतु आजारपण हें अनेकवेळां मला वरदानासारखें च ठरलें आहे. त्यावेळीं माझी एकाग्रता पराकाष्ठेला पोंचते असा मला अनुभव येतो. चांडिलच्या आधीं, चांडिलच्या आजारांत आणि या वेळीं आजारपणांत जी एकाग्रता आली ती समाधीच्या च कोटीची होती. अशा वेळीं मला नवीन विचार सुचतात. बृहदारण्यकोपनिषदांत एक वाक्य आहे "**एतद् वै परमं तपः यद् व्याधितः तप्यते.**" आजारी मनुष्य जें तप तपतो तें परम तप होय. या वस्तूचा मला अनुभव आहे. आजारपणांत मति कुंठित होण्या-ऐवजीं ती गगनांत विहार करते.

१९५७ सालानंतरची योजना तें साल पुरें होण्याच्या आधीं च सुचेल असें मीं मानलें नव्हतें. कारण एक शिखर चढल्याशिवाय वरचें दुसरें शिखर दिसत नाहीं. परंतु आजारपणांत मी ५७

सालाच्या पलीकडे जाऊन पोंचलों. आणि माझ्या मनानें घेतलें कीं ग्रामराज्य आतां होऊन च चुकलें असें समजून त्याच्या रक्षणाची चिंता आतां केली पाहिजे. आतां हें म्हणणें किती विचित्र आहे ? ग्रामराज्य झालें कुठलें ? अण्णा सहस्रबुद्धेंना कोरापुटमध्यें किती गोष्टींना तोंड द्यावें लागत आहे तें ते च जाणतात. तो सगळा एक मोठा च इतिहास बनणार आहे. परंतु ग्रामराज्याचें दर्शन होण्या-पूर्वीं च तें होऊन चुकलें असें जें मी म्हणतों तें रामदासस्वामींच्या भाषेंत म्हणतों. रामदासस्वामींनीं लिहून टाकलें कीं "**म्लेंच्छ संहार जाहला. उदंड जाहलें पाणी स्नान संध्या करावया.**" वास्तविक मुसलमानांचें राज्य कायम च होतें. औरंगजेब तर रामदासांच्या नंतर २५ वर्षांनीं मेला. परंतु रामदासस्वामींना प्रातिभ दर्शन झालें कीं परकी सत्ता गेली. वास्तविक मराठे काशीपर्यंत पोंचले हि नव्हते. पुण्यापर्यंत त्यांची सत्ता आली होती. आणि काशी नगरीच्या रोखानें मराठे चालले होते. काशी स्वराज्यांत आली कीं परकी सत्ता गेली असें त्यावेळीं समजलें जाई. प्रत्यक्ष काशी मुक्त होण्याच्या आधीं च "**उदंड जाहलें पाणी स्नान संध्या करावया**" असें रामदासांनीं लिहून टाकलें. तसें मला वाटलें कीं ग्रामराज्य झालें च, आतां ग्रामराज्याच्या रक्षणाची च फिकीर केली पाहिजे.

ग्रामराज्याच्या रक्षणाची गोष्ट मनांत आली तेव्हां मला हनुमानाची आठवण झाली. रामकार्य होऊन चुकलें. आतां रामकार्याच्या रक्षणासाठीं हनुमान पाहिजेत. तेव्हां देशांत शांति-सेनेची स्थापना केली पाहिजे असें मनांत आलें. कोझीकोड येथें पोंचल्यानंतर त्यासंबंधीं मी बोललों. त्यासाठीं काय काय करावें

लागेल याचें चित्र माझ्यासमोर उभें राहिलें. मी गणितप्रेमी असल्यामुळें पांच हजारांच्या वस्तीमागें एक सेवा-सैनिक असला पाहिजे असा मी अंदाज करून ३५ कोटि लोकांच्या सेवेसाठीं ७० हजार सेवासैनिक देशांत तयार झाले पाहिजेत असा मीं हिशोब केला. हा ५७ सालासाठीं कार्यक्रम आहे. सत्तर हजार ही संख्या तशी मोठी नाहीं. हल्लीं शस्त्रास्त्रें कमी करण्याच्या गोष्टी चालू आहेत. रशियानें अमुक इतकें सैन्य कमी करावें, अमेरिकेनें अमुक इतकें सैन्य कमी करावें असें बोलणें चालू आहे. रशियानें आपलें सैन्य कमी करून २० लाखांपर्यंत आणावें अशी सूचना आली. आतां कमींत कमी सैन्य जर २० लाखांचें असलें तर वाढविलेलें किती लाख असेल याची कल्पना च करावी. काय अजब आंकडे आहेत ! आपल्या पूर्वजांनीं २० लाखांचा आंकडा ऐकला असता तर ते म्हणाले असते कीं शांतीसाठीं देखील का २० लाखांचें सैन्य हवें ? तेव्हां ३५ कोटींच्या देशामध्यें ७० हजाराची शांति-सेना असली पाहिजे अशी जर कुणीं मागणी केली तर ती जास्त म्हणतां यायची नाहीं. उलट इतक्या थोडचा संख्येनें कसें चालेल असें च विचारलें जाईल.

आतां या शांति-सैनिकांची योग्यता काय असावी हा प्रश्न आहे. सत्याग्रही लोकसेवकांसाठीं जी पंचविध निष्ठा आपण ठरविली आहे ती तर शांति-सैनिकाला असली च पाहिजे, पण तेवढचानें भागणार नाहीं. सत्याग्रही लोकसेवक तर लाखोंच्या संख्येनें बनतील. शांतिसैनिक फक्त ७० हजार असणार. त्यामुळें हे निवडक लोक असणार. सत्याग्रही लोकसेवक कोणत्या हि राजकीय पक्षाचा सभासद असूं नये या मुद्यावर वरी च चर्चा

चालते. सेवक निष्काम असला पाहिजे ही अट मंडळींना बोंचत नाहीं. वास्तविक ही अट इतकी कठिण आहे कीं सतत गीतेचा ध्वनि कानांत घुमल्याशिवाय ती अंमलांत आणणें शक्य नाहीं. परंतु या मुद्यापेक्षां पक्षातीतचा मुद्दा लोकांना विशेष चिंतास्पद वाटतो. अलीकडे राजकारणाचा भार आमच्या चित्तावर फार वाढला आहे. इंग्रजांचें राज्य तर गेलें. परंतु त्यांनीं आमच्या डोक्यांत शिरविलेल्या राजकारणाचें ओझें कांहीं पटकून देतां आलें नाहीं. परंतु विचार करा कीं शस्त्रसैनिकानेंसुद्धां पक्षातीत असलें पाहिजे अशी अपेक्षा केली जाते. सैन्यांत जर उद्यां पी. एस. पी. वाले, कम्युनिस्टवाले, कॉंग्रेसवाले असे पक्ष बनूं लागले तर ती सेना काम करूं शकणार नाहीं. लष्करी परिभाषेंत देखील सैनिक हा पक्षनिरपेक्ष सेवक असला पाहिजे असें मानलें गेलें आहे. अशा स्थितींत सत्याग्रही लोकसेवकाच्या प्रतिज्ञेंत पक्षातीत असण्याची जी प्रतिज्ञा आहे ती तर शांति-सैनिकाला अत्यंत अपरिहार्य आहे.

रामनादपूरला नुकती च हिंसक घटना झाली. अशा हिंसक घटना कशामुळें होतात याचा जरा विचार करा. निवडणुकांच्या वेळीं माझी यात्रा त्या जिल्ह्यांत चालू होती. त्या च वेळीं माझ्या लक्षांत आलें होतें कीं हा ज्वालामुखी आहे. हरिजन विरुद्ध परिजन असा जातिभेद आधींचा च होता. हे हरिजन पुष्कळसे ख्रिस्ती आहेत आणि परिजन हिंदु आहेत. तेव्हां हिंदु विरुद्ध ख्रिस्ती असें त्याला रूप आलें. एका जातीनें एका पक्षातर्फे माणसें उभीं केलीं. दुसऱ्या जातीनें दुसऱ्या पक्षातर्फे माणसें उभीं केलीं. यांतून पक्षभेद निर्माण झाले. अशा रीतीनें जातिभेद, धर्मभेद आणि पक्षभेद अशी

त्रिगुणात्मक एक दोरी च तयार झाली. दोरी तीन पदरी जास्त मजबूत होत असते. विज्ञान आणि सांख्य दोन्हीं या बाबतींत सहमत आहेत. अशा स्थितींत शांतिसैनिक जर एखाद्या पक्षाचा असेल तर तो शांति-स्थापना करूं शकणार नाहीं. कारण पक्ष-भेदामुळें च वरीचशी अशांतता होत असते.

आम्हांला आमचा कोणता हि पक्ष किंवा संप्रदाय बनवायचा नाहीं. तशी थोडी जरी वृत्ति आमची असती तर ही जी सर्वपक्षीय ग्रामदान परिषद झाली ती झाली च नसती. ती झाली आणि त्या परिषदेनंतर आमच्या नेत्यांच्या चित्तावर तिचा खोल परिणाम झाला तो यामुळें च कीं त्यांनीं ओळखलें कीं हें काम पक्षातीत आहे एवढें च नव्हे तर याची बैठक नैतिक आहे आणि यांत आर्थिक सोडवणूक हि आहे. त्यामुळें हा एक संप्रदाय बनण्याची धास्ती आहे असें अनेकांनीं आम्हांला बजावून सावध केलें असलें तरी या आंदो-लनाचें अंतरंग पाहिलें तर ती भीति निराधार आहे असें दिसेल.

पंचविध निष्ठेशिवाय आणखी एक सहावी निष्ठा मी शांति-सैनिकासाठीं अवश्यक समजतों. ती म्हणजे सेनानीची आज्ञा मानणें. आतां कमांडरची कमांड मानली पाहिजे, ही भाषा निदान विनोबाच्या दृष्टीनें तरी मोठी विचित्र मानली जाईल. आतांपर्यंत आम्ही विचार-स्वातंत्र्य, शासनमुक्ति इत्यादि गोष्टी बोलत आलों त्याच्या अगदीं विरुद्ध ही गोष्ट वाटते. शांति-सेना आणि शस्त्र-सेना यांत इतर अनेक बाबतींत भिन्नता असली तरी शिस्तीच्या बाबतींत ती समान आहे. शस्त्र-सेनेमधें दुसऱ्याचा प्राण घेण्याची गोष्ट असली तरी स्वतःचा हि प्राण गमविण्याचा मुद्दा असल्यामुळें

त्यांत शौर्य आहे आणि म्हणून च त्या सेनेचा गौरव केला जातो. परंतु शांतिसेनेंत अगदीं च उलटें आहे. यांत फक्त स्वतःचा च प्राण गमावण्याची तयारी आहे, दुसऱ्याचा प्राण वांचविण्याची बाब आहे. कोणी तलवारीनें आमचा गळा कापूं लागला तर स्वतःचा गळा वांचविण्याचा तर प्रश्न च नाहीं परंतु तलवारवाल्याच्या हाताला दुखापत होऊं नये ही चिंता तिथें करायची आहे. त्यामुळें शिस्त ही वस्तु अनिवार्य आहे. आणि सेनापतीची आज्ञा ताबडतोब मान्य करण्याची संवय लागली पाहिजे. 'रुक जाव' म्हटल्याबरोबर पाय थांबले पाहिजेत.

केरळमध्यें मीं या प्रमाणें शांतिसेनेचा आरंभ करून हि दिला आहे. तेथें केलप्पनसारखा पुढारी आम्हांला मिळाला. त्यांचें पूर्व कर्म हि अनुकूल होतें. ते एका पक्षांत होते. परंतु त्यांनीं मुळीं च न कचरतां राजीनामा दिला. त्यांनीं सामाजिक क्षेत्रांत आणि रचनात्मक क्षेत्रांत बरें च काम केलें आहे. त्यामुळें जनतेंत त्यांची प्रतिष्ठा आहे. त्यांनीं सेनापति होण्यास मंजुरी दिली. त्यांची आज्ञा ऐकणारी एक छोटी सेना हि तिथें तयार झाली आहे. ती सेना जेव्हां तयार झाली तेव्हांचें दृश्य अद्‌भुत् होतें. ज्यांनीं तें दृश्य पाहिलें ते म्हणाले कीं असें उत्साहवर्धक दृश्य २५-३० वर्षांनंतर पहिल्यांदा च पाहिलें. १९३० सालाची आठवण लोकांना झाली. एकेक सैनिक सभेसमोर येऊन गंभीरपूर्वक प्रतिज्ञा घेत असे कीं सर्व प्रकारच्या सेवेला मी तयार आहें आणि प्रसंग आल्यास बलिदान देण्यास तयार आहें. नऊ लोकांनीं अशा प्रतिज्ञा घेतल्या. आणखी हि दहा वीस लोक प्रतिज्ञा घ्यायला उत्सुक होते. परंतु

मीं च त्यांना थांबविलें. मीं म्हटलें कीं सध्यां मला जास्त संख्या नको आहे. निवडक, परिचयाचे, आणि पारखून घेतलेले लोक च प्रथम यांत घ्यायचें आहेत. शांतिसेना हा शब्द जुना आहे. गांधींनीं त्याचा पहिल्यांदा उपयोग केला. परंतु त्या वेळची परिस्थिति अशी होती कीं त्या वस्तूचा विशेष गंभीर अर्थ त्या वेळीं निघूं शकला नाहीं. ज्या ठिकाणीं अशांति आणि हिंसक घटना बनेल तिथें बलिदान करण्यासाठीं शांतिसैनिक जावेत अशी त्यावेळीं कल्पना होती. परंतु आज जो सर्वांची मातृवत् सेवा करणारा असेल तो च शांतिसैनिक बनूं शकेल.

'मातृवत्' हा शब्द मीं विचारपूर्वक वापरला आहे. भाऊ भावाला वांचवितो, मित्र मित्राला वांचवितो, सेवक स्वामीला वांचवितो, इत्यादि अनेक उदाहरणें दाखवितां येतील. परंतु माता आपल्या वत्साला संकटाच्या वेळीं वांचविते ती अद्भुत् च घटना असते. आणि ही घटना मानवांत च नव्हे तर इतर प्राण्यांत हि दिसून येते. एखाद्या सिंहिणीचा बच्चा तुम्हीं उचलून नेला तर सिंहीण प्राणांची पर्वा न करतां तुमच्यावर तुटून पडते. तुमच्या हातांत बंदूक आहे हें ती जाणते. परंतु ती माघार घेत नाहीं. शिकारी लोक आपला अनुभव सांगतात कीं अशा वेळीं सिंह पळून जातो. परंतु सिंहीण पुन; पुन्हां चवताळून अंगावर येते. हा तिचा प्रयत्न अगदीं शेंवटपर्यंत चालतो. गोळी लागून ती मरून पडते तेव्हां च तिचा प्रयत्न थांबतो. आपल्या बालकाला वांचविण्यासाठीं जें काय करणें शक्य होतें तें मीं केलें या समाधानांत ती मरते. हें शांतिसेनेचें च तत्त्व आहे. सिंहीण सर्वोदयविचार थोडी च मानणारी

असते ! आपल्या छाव्याला वांचवायचें ही एक च धुन तिला असते. आपल्या वत्साला घेऊन जाणाऱ्याला फाडून टाकण्यास हि ती उद्युक्त होते. परंतु त्या प्रयत्नांत मरून जायला हि तयार असते. म्हणून मीं मातेचें उदाहरण दिलें. ती जशी आपल्या वत्सासाठीं धावून जाते त्याप्रमाणें आपला शांतिसैनिक धावून गेला पाहिजे. जनतेची वात्सल्यभावानें सेवा करून ज्यानें स्नेह निर्माण केला असेल तो च शांतिसैनिक बनूं शकेल. आणि मग संकटाच्या प्रसंगीं प्राण द्यावा लागला तर त्याला मुळीं च खंत वाटत नाहीं. तो तें प्रेमकार्य समजतो. म्हणून शांतिसेना ही नेहमींसाठीं सेवा-सेना च असणार.

प्रत्येक सेनेला आध्यात्मिक आणि भौतिक आधार असतो. सरकार जी सेना बनविते तिचा आध्यात्मिक आधार कोणता ? लोकांनीं सरकारला जें मत दिलें तो तिचा आध्यात्मिक आधार होय. तसें नसतें तर ती सेना एक लुटारी टोळी ठरली असती. आतां हा मताचा आधार अत्यंत क्षीण आहे हें खरें. कारण एकूण मतदारांपैकीं समजा कीं ४० टक्के लोकांनीं मत च दिलें नाहीं. उरलेल्या ६० टक्यांपैकीं ३० टक्के मतें एका पक्षाला मिळालीं आणि बाकीचीं ३० टक्के निरनिराळ्या पक्षांत विभागलीं गेलीं, तर ३० टक्के मतें ज्या एका पक्षाला मिळतात तो पक्ष सत्तारूढ होतो. म्हणजे लोकशाही पद्धतींत ३० टक्यांच्या आधारावर निवडून आलेला पक्ष १०० टक्के लोकांची सेवा करीत नाहीं पण त्यांच्यावर सत्ता चालवितो ! ज्या समाजांतील लोकांचीं फक्त ३० टक्के च मतें मला मिळालीं असतील अशा लोकांचीं सेवा करणें देखील मला कठिण जाईल. जे माझी सेवा इच्छीत नाहींत त्यांच्यावर माझी

सेवा मीं लादावी हें किती विचित्र होईल. परंतु लोकशाहींत सेवा लादण्याचा प्रश्न च नाहीं, इथें तर सत्ता लादली जाते. आणि त्या आधारावर सेना बनते. अशा रीतीनें जनतेचें सँक्शन (मान्यता) तिच्या पाठीशीं असल्यामुळें तो त्या सेनेचा आध्यात्मिक आधार बनतो.

परंतु आमच्या सेनेला आध्यात्मिक आधार कोणता, असा जेव्हां मी विचार करतों तेव्हां लोकांची संमति हा च तो आधार होऊं शकतो असें मला वाटतें. आम्ही एखादें सेवाकार्य करतों तेव्हां करुणेनें प्रेरित होऊन सेवा करण्याची आमची इच्छा आहे एवढें पुरेसें असतें. आम्ही खादीचें, ग्रामोद्योगाचें, काम सुरूं केलें त्यांत सर्वांची संमति घेत बसलों नाहीं, ज्याच्या हृदयांत करुणा आहे त्याला सेवेचा अधिकार आहे असें मानून आम्हीं खेड्यांत जाऊन खादीचें काम सुरूं केलें. हें काम सर्वांना पसंत आहे कीं नाहीं याची फिकीर न करतां आम्हीं सारा गांव खादीधारी बनविण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न कुठें २५ टक्के तर कुठें ३५ टक्के यशस्वी झाला. पण पुढें काम अडलें. जेवढें काम झालें तें हि पुष्कळ झालें असें आम्हीं मानलें.

रचनात्मक कार्याच्या क्षेत्रांत सर्वांची संमति आम्हीं मिळविली नाहीं तें मी समजूं शकतों, कारण सेवा करण्याचा कोणाला हि अधिकार आहे, परंतु शांतिसैनिक बनून जेव्हां मी एकूण एक सर्वांची सेवा करायला निघतों तेव्हां त्या सर्वांची संमति मला मिळाली नसेल तर माझ्या पायांत जोर च राहणार नाहीं. सर्वोदयाच्या बाबतींत मी अशा संमतीची गोष्ट बोललों नाहीं.

आमच्या मागें किती लोक आहेत किंवा किती पक्षांनीं आमचा विचार मान्य केला याची फिकिर न करतां कालडीच्या संमेलनांत मीं जाहीर करून दिलें कीं ग्रामदानाचा आणि ग्रामराज्याचा आमचा हा संकल्प विश्वसंकल्प आहे. एखादा निर्मल, शुद्ध, संकल्प जेव्हां अविरोधपणें प्रकट होतो तेव्हां तो विश्वसंकल्प बनतो असें मीं म्हटलें होतें. परंतु आम्ही जेव्हां केवळ सेवेचा नव्हे तर लोकांच्या चित्तावर नैतिक प्रभाव पाडण्याचा अधिकार इच्छितों तेव्हां लोकांकडून आम्हांला संमति मिळण्याची गरज आहे. याला मीं संमतिदान नांव दिलें.

तुमची सेवा आम्हांला मंजूर आहे आणि त्यासाठीं आम्हीं कांहीं ना कांहीं करूं इच्छितों असें सांगण्याला मी संमतिदान म्हणतों. आज सरकारला जें मत मिळतें तें निष्क्रिय असतें. "तुम्हांला सेवेचा अधिकार दिला" असें सांगण्यापलीकडे अधिक कांहीं करण्यास मतदाता बांधलेला नसतो. टॅक्स इत्यादि वाढवाल तर आम्ही द्यायला बांधलेलों असतों इतकें च. परंतु आम्ही तुमच्यासाठीं कांहीं करूं अशी प्रतिज्ञा त्या मनांत नसते. आम्ही जी संमति शांतिसेनेंत मागतों ती रक्षणाच्या अधिकाराची संमति मागत नाहीं. तसें झालें तर आम्ही रक्षक आणि तुम्ही रक्षित अशी भूमिका बनून आमचा एक (अहिंसक) क्षत्रियवर्ण बनेल. तसा अधिकार आम्ही मागत नाहीं. परंतु तुमची सेवा आम्हांला मान्य आहे या तुमच्या संमतीचें प्रतीक म्हणून पांच माणसांच्या प्रत्येक कुटुंबागणिक एक गुंडी मिळावी असें आम्ही इच्छितों. याला च मी संमतिदान म्हणतों. केरळवाल्यांनीं सुचविलें कीं

संमतिदान म्हणून एक नारळ स्वीकारण्यांत यावा. ही हि सूचना ठीक आहे. मंगल कार्यासाठीं नारळ देतात च. आणि केरळमधें घरोघर नारळ होतो. तेव्हां गुंडीच्या ऐवजीं अशी एखादी वस्तु लोकांनीं दिली तरी चालेल. हें जें संमतिदान तो आमच्या शांति-सेनेचा आध्यात्मिक आधार झाला.

आतां भौतिक आधार शांतिसेनेचा कोणता? सर्वोदय-विचाराची खुबी च ही कीं जो आध्यात्मिक आधार असतो तो च भौतिक आधार हि बनतो. पांच हजारांमागें एक शांतिसैनिक असावा अशी कल्पना आहे. पांच हजार माणसांकडून पांच हजार नारळ मिळाले तर एका सैनिकाच्या शारीरिक जीवनाची सोय त्यांत होते. ती कमी पडली तर संपत्तिदानांतून मदत घेतां येते.

तुम्हांला अशा रीतीनें साऱ्या भारतांत पसरून जायचें आहे. सर्व-सेवा-संघाला हि मीं तें च सांगितलें. सारा भारत व्यापून टाकण्याचें कर्तव्य नेता परिषदेंतल्या त्या संहितेंत सामावलेलें आहे. त्या संहितेवरचें एक भाष्य तर मीं कालच्या जाहीर सभेंत केलें च. आतां हें दुसरें भाष्य समजून घ्या. संहिता सांगत आहे कीं कम्युनिटी डेवलपमेंटचें (सामूहिक विकास कार्य) काम आणि ग्रामदानाचें काम यांत सहयोग होणें अवश्यक आहे. याचा अर्थ काय? कम्युनिटी प्रॉजेक्ट पांच लाख खेड्यांत पसरायचे आहेत. उद्यां जर एखाद्या खेड्यांतल्या प्रॉजेक्टच्या अधिकाऱ्यानें एखाद्या प्रश्नावर तुमची मदत मागितली आणि तुम्हीं उत्तर दिलें कीं आमचा कोणी मनुष्य च त्या खेड्यांत नाहीं तर तुम्हीं या संहि-तेचें पालन केलें नाहीं असा त्याचा अर्थ होईल. तुम्हीं त्यांच्याशीं

सहकार केला नाहीं असा त्याचा अर्थ होईल. म्हणजे जितक्या गांवांत त्यांचें काम पसरेल तितक्या गांवांत तुम्हांला पसरून जायला हवें, तेव्हां च सहयोग करतां येईल. तीं सगळीं गांवें ग्रामदानाचीं न बनलीं तरी सर्वोदयाचा रंग त्या गांवांना जरूर लागला पाहिजे. पण आम्ही त्या लोकांइतके व्यापक च न बनलों तर आपला काय रंग चढणार ? ते लोक म्हणतील कीं "सर्वोदय-वाले आम्हांला सहकार देतील अशी अपेक्षा आम्हीं केली होती पण यांचें तर अस्तित्व हि दिसत नाहीं. कोरापुट वगैरे कांहीं भागांत यांचें काम चालतें इतकें च. यांचें काम फक्त कांहीं मर्या-दित क्षेत्रांत च आहे. सर्वत्र यांचा सहयोग आम्हांला मिळूं शकत नाहीं."

म्हणून आपलें काम सर्वत्र पसरण्याचा उपाय हा च कीं ग्रामराज्य झालें असें समजून पुढच्या कामाला लागावें. ग्रामदान, ग्रामनिर्माण इत्यादि कामें चालतील च. परंतु ग्रामरक्षणासाठीं शांतिसेना उभी करणें हें मुख्य काम आहे. त्या सेनेचा आधार आहे संमतिदान.

या शांतिसेनेला सेनापतीची आज्ञा मानावी लागेल असें मीं म्हटलें. श्रद्धेय सेनापति, श्रद्धावान सैनिक, आणि विशिष्ट क्षेत्राची सेवा-योजना; या तीन गोष्टी जिथें एकत्र होतील तिथें सैनिकाला सेनापतीची आज्ञा मानावी लागेल. साऱ्या भार-ताच्या शांतिसेनेसाठीं एखादा सर्वोच्च सेनानी लागेल (सुप्रीम कमांड). तें काम तर परमेश्वर च करील. ज्या भाषेंत मी बोलतों त्याहून वेगळ्या भाषेंत बोलण्याची शक्ति माझ्यांत नाहीं. परंतु

एकूण लक्षणें पाहतां साऱ्या भारताच्या शांतिसेनेचें सेनापतित्व विनोबाला च पत्करावें लागेल असें दिसतें. आणि तशी मानसिक तयारी विनोबानें केली आहे. ही गोष्ट मीं आज तुमच्यासमोर मांडली आणि जे देशांत शांतिस्थापनेसाठीं चिंतित आहेत अशा आमच्या दुसऱ्या मित्रांसमोर हि मांडली.

आतां यासाठीं काय काय तयारी करावी लागेल या बाबतींत आपल्याला नीट विचार केला पाहिजे. चारूबाबूंनीं जें पुस्तक लिहिलें तें या बाबतींत पुरेसें नाहीं. त्या पुस्तकाला एखादें प्रकरण जोडण्यानें हि काम भागणार नाहीं. अगदीं नव्यानें आणि स्वतंत्र दृष्टीनें विचार करावा लागेल.

यासाठीं काय करावें लागेल याचा जेव्हां मी विचार करतों तेव्हां मला असें वाटतें कीं देशांत जेवढ्या म्हणून रचनात्मक संस्था आहेत त्या सर्व या कार्यांत समर्पण झाल्या पाहिजेत. खादीचें काम करणारी, नई तालीमचें काम करणारी, अस्पृश्यता निवारण करणारी, आणि अशीं च इतर कामें करणारी जी कोणती म्हणून संस्था आहे ती सर्व यांत समर्पण झाली पाहिजे. जो खादीसेवक शांतिसैनिक होणार नाहीं त्याला आपण हीन समजतां कामा नये. तो हि एक सेवक आहे. करावी त्यानें सेवा. परंतु जो खादीसेवक शांतिसैनिक बनेल तो खादीला जिवंत ठेवील. आणि दुसरा खादीसेवक खादीला जिवंत न ठेवतां तिच्या आश्रानें स्वतः जिवंत राहील. तो खादीचें पालन करणार नाहीं, पण खादी च त्याचें पालन करील. असे अनेक सेवक असतील. परंतु ७० हजार शांतिसैनिक कोठून निघतील याचा जेव्हां मी विचार

करतों तेव्हां पहिल्या प्रथम आमच्या संस्थांकडे माझें लक्ष जातें. या क्षेत्रांतून सैनिकांची निवड करतां येईल अशी माझी अपेक्षा आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं अनपेक्षित क्षेत्रांतून आमची अपेक्षा पुरी होणार नाहीं. तसें होत असतें म्हणून च ईश्वरावर श्रद्धा बसते. आपल्या सर्व अपेक्षा जर पुऱ्या च होत गेल्या तर मग ईश्वराची जरूर च उरणार नाहीं. आम्ही योजना करीत जाऊं आणि त्या पार पडत जातील. पण तसें होत नाहीं. आमच्या योजना पुऱ्या पडत नाहींत अशा वेळीं तो योजना पुरी करीत असतो. म्हणून अनपेक्षित क्षेत्रांतून हि आम्हांला शांति-सैनिक मिळूं शकतील. परंतु आमचा प्रथम प्रयत्न आमच्या अपेक्षित क्षेत्रांतून च होणार. गांधीजींच्या नांवानें जितक्या म्हणून संस्था चालल्या आहेत त्या सगळ्यांवर विनोबाचा अधिकार आहे असें विनोबा तुम्हांला सांगूं इच्छितों. असें असलें तरी त्यांत हि कमी अधिक अधिकार असतो च. त्यामुळें विनोबाचा जास्तींत जास्त अधिकार ज्या संस्थेवर होता त्या संस्थेचें समर्पण करण्याचें मीं ठरविलें आहे. ती संस्था म्हणजे ग्रामसेवा मंडळ गोपुरी (वर्धा). बंग इत्यादि भूदानाच्या कार्यकर्त्यांना मीं सांगून टाकलें आहे कीं तुम्ही ही संस्था सांभाळा. ही संस्था भूदानमूलक करण्या-साठीं हिच्यांत जें काय परिवर्तन करायचें असेल तें करा. हा अधिकार मीं त्यांना दिला आहे. तदनुसार कांहीं परिवर्तन झालें आहें, आणि अधिक विचार पुढें होईल हि. ही सूचना संस्थेला मीं केली त्यावेळीं शांतिसेनेचा विचार नव्हता. तेव्हां मीं इतकें च म्हटलें होतें कीं "ग्रामदान मूलक, ग्रामोद्योग प्रधान, शांतिमय क्रांतीसाठीं ही संस्था समर्पण होवो." परंतु शांतिसेनेशिवाय अहिं-

सक क्रांति शक्य नाहीं. त्यामुळें शांतिसेनेचा विचार शांतिमय क्रांतीच्या पोटांत येऊन जातो. संस्थावाल्यांनीं या बाबत अधिक विचार करून निर्णय करावा. जे शांतिसैनिक बनणार नाहींत ते आपलें काम करीत च राहतील. कोणी कोणाला सूचना करून शांतिसैनिक बनवायचा यांत मुद्दा नाहीं. हें काम तर "**हरिनो मारग छे शूरानो**" सारखें आहे. आंतून च प्रेरणा झाली पाहिजे. शस्त्रसैनिकाला हातांत तलवार देऊन सांगण्यांत येतें कीं "तुझ्या हातांत मारण्याचें साधन दिलें आहे परंतु मरायचा प्रसंग आला तरी तयार राहिलें पाहिजे." आणि हल्लीं तर लष्करी नियमा-प्रमाणें तयारीचा प्रश्न च नाहीं. कोणीं माघार घेतली तर आपल्या च लोकांच्या गोळीनें तो मरायचा. म्हणून पाठ दाखविण्याचा पर्याय त्याच्यापाशीं शिल्लक च नसतो. शौर्य देखील यांत्रिक करून टाकलें आहे. शौर्य हा गुण न राहतां यांत्रिक बाब बनली. परंतु आपल्या शांतिसेनेंत तशी स्थिति नाहीं. इथें अंत:प्रेरणेचा प्रश्न आहे. म्हणून सावधपणानें पाऊल टाकलें पाहिजे. सुरवातीला सैनिकांची संख्या कमी च रहावी. हळू हळू ती वाढेल.

शांतिसेनेची अवश्यकता अगदीं मूलभूत आहे. रामनादपूर आणि मदुरा जिल्ह्यांत हत्याकांड सुरूं झालें. आतां तिथें काय ग्रामदानाचें काम होणार? परस्पर प्रेम आणि शांति ही मूळ वस्तु आहे. तिचा उत्कर्ष ग्रामदानांत प्रकट व्हायचा. परंतु जिथें मूळ वस्तु च दिसत नाहीं तिथें उत्कर्ष कसा प्रकट होणार? शांतिस्थापनेशिवाय ग्रामदान इत्यादि सारें मृगजळ ठरेल. मी केरळमध्यें फिरत होतों परंतु पंजाबच्या परिस्थितीमुळें मला चिंता

उत्पन्न झाली होती. अगदीं क्षुल्लक गोष्टीवरून तिथें झगडा निर्माण केला गेला आहे. भाषा एक च. फक्त लिपींत थोडा बदल. तो तरी किती ? ⅓ अक्षरें तर नागरी च आहेत. ⅓ नागरी-सारखीं आहेत. आणि अगदीं थोडीं अक्षरें भिन्न आहेत. अशा किरकोळ मुद्द्यावर अडून बसले आहेत आणि हिंसक कृत्यें करीत आहेत. आज कोणत्या शहरांत केव्हां हिंसा प्रकट होईल याचा भरंवसा च उरला नाहीं. शहरांतील दूषित हवा खेड्यांत पसर-विण्याची सुव्यस्थित योजना म्हणजे निवडणुका. या निवडणुकां-पासून कोरापुटचीं खेडीं कशीं वांचतील याची चिंता कोरापुटच्या कार्यकर्त्यांना लागून राहिली होती. त्यामुळें शहरांचा च काय पण खेड्यांचा हि भरंवसा सांगतां येत नाहीं. कोणत्या हि क्षणीं सारीं ग्रामदानी गांवें धोक्यांत येऊं शकतात. म्हणून आपल्याला विचार-पूर्वक योजना केली पाहिजे.

पंचविध निष्ठेबरोबर शांतिसैनिकांसाठीं मीं सेनापतीची आज्ञा मानण्याची सहावी निष्ठा जोडली. सामाजिक जीवनाचा मूलभूत विचार काय आहे तो समजून घ्या. विचार-स्वातंत्र्य आणि आचार-नियमन हा तो विचार आहे. या विचाराचें उत्तम उदाहरण म्हणजे आपला हिंदु धर्म. हिंदुधर्मात सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्व मीमांसा, उत्तर मीमांसा, बौद्ध, जैन इत्यादि किती तरी दर्शनें होऊन गेलीं. भारतभूमि तत्त्वज्ञान्यांची भूमि असल्यामुळें इथें अनेक तत्त्व-विचारक होऊन गेले. या विचार-कांनीं एकमेकांवर अत्यंत तीव्र शब्दांत प्रहार हि केले आहेत. संस्कृत भाषेंत जितकें विचार-स्वातंत्र्य मला आढळून आलें तितकें

जगाच्या कोणत्या च भाषेंत मला आढळलें नाहीं. परंतु या विचार-स्वातंत्र्याबरोबर आचार-नियमन जर राखलें नसतें तर धर्म न बनला नसता.

म्हणून सर्वोदय-विचारांत विचार-स्वातंत्र्याची गोष्ट असतांना मी जेव्हां शांतिसैनिकानें सेनापतीची आज्ञा मानण्याची गोष्ट सांगतों तेव्हां या दोहोंत विरोध नाहीं हें नीट समजून घ्या. संस्कृत-मधें मीं जीं साम्य-सूत्रें रचलीं आहेत त्यांत एक सूत्र "**संयतेन स्वैरम्**" असें आहे. विचारांत जर तुम्ही स्वैर राहूं इच्छित असाल तर आचारांत तुम्हांला संयत च रहावें लागेल. चालतांना रस्ता निश्चित ठरलेला असेल तर विचार स्वैरपणानें करतां येतो. परंतु आपण जात आहोंत तो रस्ता बरोबर आहे कीं नाहीं याबद्दल जर शंका असेल तर मनुष्याला रस्त्याबद्दल च फिकिर करावी लागते. त्याला स्वैर चिंतन करणें शक्य होत नाहीं. म्हणून आचारांत संयत राहणारा मनुष्य च विचारांत स्वैर राहूं शकतो.

सर्वोच्च सेनापतिपद मला च हातीं घ्यावें लागेल असें लक्षण दिसत असल्याचें मीं मघां म्हटलें. पण मीं तर त्याचा आरंभ हि करून दिला आहे. राजम्मानें मला एक विस्तृत पत्र लिहून आपल्या कामाची एक योजना माझ्याकडे पाठविली होती. परंतु मीं तिला दोन ओळींत उत्तर लिहिलें कीं "योजना चांगली असली तरी सध्यां अमुक अमुक ठिकाणीं जास्त काम करण्याचा तुझा धर्म आहे." यापेक्षां अधिक कांहीं च लिहिलें नाहीं. कोणतें हि कारण किंवा युक्तिवाद मांडला नाहीं. आणि त्या बहाद्दर मुलीनें ताबडतोब त्या आज्ञेचें पालन केलें आणि सांगितलेल्या

ठिकाणीं ती जाऊन पोंचली. इथें आतां भेट झाल्यावर तिला मीं माझा विचार समजावून सांगितला. मीं म्हटलें कीं आजच्या स्थितींत आपल्या हालचालींना जर विलंब झाला तर लोकशाही-प्रमाणें सर्वोदयाला हि तो मोठा अभिशाप ठरेल. डिले (विलंब) हा डेमॉक्रसीला (लोकशाहीला) अभिशाप आहे. म्हणून आपण हुकूम झाल्याबरोबर चालूं लागले पाहिजे. नानकानें म्हटलें आहे कीं "**हुक्म रजाई चल्लणा नानक लिखिया नाम.**" तो भगवान् हुकूम देणारा आहे आणि त्याच्या हुकुमाप्रमाणें नानकानें चालायचें ठरविलें आहे.

• • •

## सर्वोच्च सेनानीचा अर्थ

[ गुजराथच्या कार्यकर्त्यांसमोर सकाळीं २७।७।५७ झालेलें भाषण ]

सुरवातीला नारायण देसाई यांनीं पुढील प्रश्न विचारले.

(१) "काल तुम्हीं शांतिसेनेबाबत जें सांगितलें तें पटलें नाहीं. आजपर्यंत विचार-शासन आणि कर्तृत्वविभाजन ही गोष्ट आम्ही तुमच्याकडून ऐकत आलों. काल आचार-नियमनाची गोष्ट ऐकली. कर्तृत्वविभाजन आणि आचार-नियमन एक च वस्तु आहे काय ?

(२) तुम्हीं सुप्रीम कमांडची (अंतिम सत्ता) जी गोष्ट काल सांगितली ती शांतिसेनेपुरती च मर्यादित आहे कीं इतर क्षेत्रांत हि लागू होणार आहे ?

(३) सुप्रीम कमांडबरोबर मग लेफ्टनंट, सक्सेसर ( वारस इत्यादि) इत्यादि गोष्टी हि येणार काय ?

(४) केंद्रीकरणामुळें निर्माण होणाऱ्या दोषांतून हिंसा प्रकट होते. त्या हिंसेला तोंड देण्यासाठीं केंद्रित पद्धतीवर आधारलेली, अहिंसक का होईना, पण सेना च पाहिजे असें आहे का ?

(५) सेनापति लोकांनीं निवडायचा कीं तो स्वतः च सेनापति बनेल ? तुमच्या भाषणांत ईश्वराचा उल्लेख तुम्हीं केला ती एक रक्षणकारी वस्तु मला वाटली. ईश्वर तुम्हांला सेनापति बनविणार नाहीं, अशी मला उमेद आहे.

या प्रश्नांच्या उत्तरांत विनोबा म्हणाले :—

तुम्हीं फार च चांगले प्रश्न विचारले आहेत. त्या व्याख्याना-नंतर असे प्रश्न उत्पन्न झाले नसते तर माझ्यासमोर एक जड वस्तु उभी होती असें च मला वाटलें असतें.

शासनमुक्त समाज हें आपलें ध्येय आहे. तसा समाज निर्माण झाला कीं तो शांति-सेना-मुक्त देखील होणार. प्रत्येक ठिकाणीं सेवक वर्ग असेल. प्रत्येक घरांत तशा वृत्तीचीं माणसें असतील. एखादी अनुचित गोष्ट घडली तर तिला तोंड देऊन आपल्या स्वतःवर प्रहार ओढवून घेण्यासाठीं सेवक-वर्ग तयार असेल. बापाकडून वाईट गोष्ट घडली तर मुलगा संभाळील आणि मुलाकडून वाईट गोष्ट घडली तर बाप संभाळील. अशा रीतीनें त्या आदर्श समाजव्यवस्थेंत गांवोगांव आणि घरोघर परभारें परिस्थिति सांभाळली जाईल. त्या वेळीं कुणा शांतिसैनिकाला कुठें जायला सांगण्याचा प्रश्न उत्पन्न होणार नाहीं, कीं कोणाला जाण्याचा प्रश्न उत्पन्न होणार नाहीं.

परंतु हिंसक शक्ति हानिकारक आहे असें स्पष्टपणें मानलें जात असून हि ती संरक्षणकारी आहे असें कां मानलें जातें या गोष्टीचा विचार केला पाहिजे. हिंसेनें कोणती हि समस्या सुटत नाहीं हें सगळे मान्य करतात. परंतु रक्षणाचा प्रश्न निर्माण झाल्यावर हिंसादेवीचा आधार मान्य केला जातो याचें काय कारण आहे ?

आपण शब्दांमुळें घाबरून जातां कामा नये. शब्द समजा-वण्यासाठीं असतात. आपल्या देशांत कांहीं शब्द वीर परंपरेचे

आणि कांहीं शब्द संत परंपरेचे चालत आले आहेत. संत परंपरेच्या शब्दांबरोबर त्यांच्या अर्थच्छायेच्या रूपानें कांहीं दुबळेपणा हि प्रकट होतो. नम्रता, दीनता, लीनता, निरहंकारिता, शून्यता, अनाक्रमणशीलता, शरणता, आत्मनिंदा, स्वत:विषयीं तुच्छता दर्शविणाऱ्या शब्दांचा संत नेहमीं उपयोग करतांना दिसतात. या शब्दांच्या चांगल्या भावाबरोबर कांहीं वाईट भाव हि दुर्बलतादर्शक प्रकट होतात.

तसें च वीरपरंपरेंतून शौर्य, धैर्य, वीर्य, पराक्रम इत्यादि शब्दांबरोबर आक्रमणकारिता, अहंकार, अस्मिता, सत्ता, दुसऱ्यांवर लादण्याची वृत्ति इत्यादि भाव हि प्रकट होतात.

या दोन्ही परंपरेंतून लाभलेले शब्द अत्यंत पवित्र आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे. या दोहोंपैकीं एका हि परंपरेचे शब्द जर आपण तोडले तर पक्ष्याच्या दोन पंखापैकीं एक पंख कापल्यासारखें होईल. दोहोंपैकीं एक पंख जरी तुटला तरी पक्षी उडूं शकत नाहीं. म्हणून आमच्या विचारशास्त्राचे हे दोन पंख समजले पाहिजेत. 'महावीर' ही संज्ञा परिपूर्ण अहिंसा मानणाऱ्या जैनधर्मी तीर्थंकराला जशी आहे तशी राक्षसांचा संहार करणाऱ्या हनुमानाला हि 'महावीर' ही संज्ञा आहे. संस्कृतांत या दोघांना च 'महावीर' म्हटलें जातें. पहिला जैनांचा तीर्थंकर आणि दुसरा रामायणाचा अधिष्ठाता आर्य हनूमान. एक संतपरंपरेचा प्रतिनिधि तर दुसरा वीरपरंपरेचा प्रतिनिधि. दोघे ही भक्तशिरोमणि आहेत. आतां 'वीर' शब्द आपण सोडून देणार का ? म्हणून 'कमांड' वगैरे

शब्दांनीं बिचकायचें किंवा घाबरायचें कारण नाहीं. त्यानें निर्भयताव्रत गमावल्यासारखें होईल.

दुसरी गोष्ट ही लक्षांत घेतली पाहिजे कीं विनोबा जेव्हां बोलतो तेव्हां स्व-निरपेक्ष बोलत असतो, तुम्हांला हें लक्षांत यायला पाहिजे कीं हा मनुष्य आपली पदयात्रा कधीं सोडणार नाहीं. अशा स्थितींत सुप्रीम कमांडचा अर्थ काय ? एखाद्या ठिकाणीं जर एखादी भयानक हिंसक घटना घडली तर सत्याग्रह-परंपरे-प्रमाणें उपवास वगैरेचा प्रश्न उत्पन्न होतो. आत्मा व्यापक असल्या-मुळें अशा पापाची जबाबदारी सत्याग्रही मनुष्य आपली समजूं शकतो. आणि त्या पापक्षालनासाठीं हिंसेच्या विरुद्ध अंतिम उपाय म्हणून अनशन करण्याचा प्रसंग येऊं शकतो. सुप्रीम कमांड हातांत घेण्याचा अर्थ हा होतो कीं अशा अंतिम प्रसंगाच्या वेळीं विनोबा अनशनाची जबाबदारी पतकरीत आहे.

तसें पाहिलें तर विनोबाची वृत्ति अशी आहे कीं जगांत केवढी हि हत्या झाली तरी त्याच्या तीन वेळच्या खाण्यांत मुळीं च खंड पडणार नाहीं. त्या हत्येचा यत्किंचित हि परिणाम विनोबाच्या अशनावर (खाण्यावर) होणार नाहीं. कारण विनोबा वेदान्त आधीं शिकला आणि अहिंसा गांधीजींकडून मागाहून शिकला. त्याच्या आधीं तो वेदांत शिकला होता. त्यामुळें शरीर कोणत्या हि वेळीं पडलें तरी त्याला त्याची मुळीं च फिकीर नाहीं आणि शोक हि नाहीं ! म्हणून कमांड हातांत घेण्याचा अर्थ इतका च कीं ज्यावेळीं अनशनाशिवाय दुसरा कोणता च मार्ग शिल्लक नाहीं अशी परिस्थिति उत्पन्न होईल तेव्हां अनशन करायचें. जगांतील

कोणत्या हि पापाची जबाबदारी आपल्यावर मानण्यास विनोबा मुळीं च तयार नसतांना तो ही अशी जबाबदारी घेतो याचा अर्थ परिस्थितीची तितकी गंभीरता आहे असें समजलें पाहिजे. म्हणून स्वनिरपेक्ष राहून हि विनोबा आपल्या स्वभावाविरुद्ध ही जबाबदारी उचलण्यास तयार झाला आहे.

यांत एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे कीं शिस्तीची गोष्ट फक्त शांतिसेनेबाबत च आहे. अन्य क्षेत्रांत ती गोष्ट लागू नाहीं. आतां एका सेनापतीच्या हाताखालीं उप-सेनापति वगैरे असतील कीं नाहीं हा जो प्रश्न विचारला आहे त्याचें उत्तर हें कीं 'होय' होऊं शकतील'. आणि होऊं शकतील इतकें च काय पण होऊन चुकले हि आहेत. केरळमध्यें ७-८ लोकांनीं शांतिसैनिकांची प्रतिज्ञा माझ्या समक्ष घेतली आणि ही शिस्त स्वीकारीत असल्याचें सांगितलें. त्या ठिकाणीं केलप्पन यांना प्रमुख नेमण्यांत आलें आहे. आपापल्या विभागांत टोळी बनवून मार खाण्यासाठीं सेनापति उभा करून दिला आहे. अहिंसेमधें आपली आहुति देण्यापलीकडे अन्य कोणती कमांड असत च नाहीं. या शिवाय कमांडचा दुसरा अर्थ असा कीं अमुक एका विशिष्ट स्थानीं शांतिस्थापनेसाठीं जाण्याचा प्रसंग उत्पन्न झाल्यास त्यासाठीं जाण्यास सैनिक तयार असला पाहिजे.

हिंसेची रक्षण-शक्ति कशांत आहे याचा विचार केल्यास दिसून येईल कीं धोक्याच्या विशिष्ट ठिकाणीं हिंसाशक्ति आपला एक समूह उभा करूं शकते अशी व्यवस्था तिच्यापाशीं आहे. असा समूह उभा करण्याची अहिंसेंत शक्ति नसेल तर आपलें काम कसें होणार ?

आतां यांत असा प्रश्न उभा होतो, आणि काल दादा धर्माधिकारी यांनीं तो उपस्थित हि केला, कीं आज्ञा देऊन बलिदानाची तयारी करतां येते काय? आणि समजा तशी तयारी करतां येते असें मानलें तर आज्ञेनें हृदयांत प्रेम उत्पन्न होऊं शकतें काय? मीं कालच्या व्याख्यानांत बलिदान कोणत्या भावनेनें द्यावें या बाबत उदाहरण देतांना प्रेमाची च अपेक्षा केली नाहीं, तर मातृवात्सल्याची अपेक्षा केली आहे. आई आपल्या अपत्त्यासाठीं ज्या भावनेनें बलिदान करते ती भावना हवी. आमच्या डोक्यावर समोरचा माणूस प्रहार करीत असेल तर आपलें डोकें कसें वांचेल याची चिंता आम्हांला राहणार नाहीं परंतु मारणाराचा हात दुखणार तर नाहीं याची च चिंता राहील. हें सांगून तर दिलें. परंतु प्रश्न असा कीं हें सगळें आज्ञेनें होऊं शकतें का? मीं उत्तर दिलें कीं स्वतंत्र चिंतनानें जर ही वस्तु होऊं शकतें असें मानलें तर आज्ञेनें तें लेशमात्र हि कमी होण्याचा संभव मला वाटत नाहीं. जें काम प्रभु रामचंद्र ज्ञानपूर्वक करूं शकतात तें च काम हनुमान श्रद्धापूर्वक करूं शकतो. मारुतीला वनस्पति (संजीवनी) आणण्यास सांगितलें तर त्यानें रामासमोर सबंध पर्वत च आणून ठेवला. तो म्हणाला, 'वनस्पतीचें ज्ञान कांहीं मला नाहीं तेव्हां हा सारा 'मटीरिया मेडिका' समोर आणून ठेवला आहे. जी वनस्पति पाहिजे ती निवडून घ्या. पुनः तो पर्वत जागच्या जागीं नेऊन ठेवीन.' या त्याच्या अपूर्व श्रद्धेमुळें रामायणामधें जो महिमा रामाचा आहे तो च त्याच्या दासाचा—हनुमानाचा—आहे.

या बाबतींत बापूंशीं चर्चा झाली होती त्याची थोडी माहिती तुम्हांला सांगतों. १९४२ च्या चळवळीच्या आधींची ही गोष्ट. त्या

वेळीं बापूंच्या मनांत होतें कीं आतांपर्यंत जेलमधें गेल्यानंतर तिथली शिस्त आदर्श सत्याग्रही या नात्यानें आपण पाळत आलों. परंतु आतां जेलमधें आपल्याला रहायचें नाहीं. इंग्रजांना आपण 'चले जाव' असें म्हणत आहोंत. तेव्हां सरकारनें पकडून जेलमधें टाकल्याबरोबर आपण उपवास सुरू करून द्यायचा. हें कोणाला जमेल ? उपवास करणें तितकें कठिण नाहीं. पण प्रेम-पूर्वक तो झाला पाहिजे. बरें, एकानें तसा उपवास केला तरी प्रेम-पूर्वक उपवास करून मरून जाण्याचें एखादें जन-आंदोलन उभें करणें शक्य आहे काय ? असा विषय होता. याची सुरवात बापू स्वत: च करणार होते. त्यामुळें सगळे लोक चिंतित होते. बापूंचा हा उपवास कसें तरी करून टळावा असें सर्वांना वाटत होतें. आस-पासच्या मंडळींना वाटत होतें कीं प्रेमपूर्वक उपवास करण्याची सामुदायिक चळवळ होऊं शकत नाहीं. उपवासांची शृंखला आज्ञेच्या आधारानें सुरू करतां येणार नाहीं, असें त्यांना वाटत होतें. यांत बापूंचा प्राण वांचावा एवढी च दृष्टि नव्हती तर कांहीं लोकांना विचारत: च ती वस्तु शक्य वाटत नव्हती. तेव्हां बापूंनीं मला बोलावले आणि आपल्या मनांतली योजना माझ्यापुढें मांडून मला प्रश्न विचारला कीं "ज्ञानी पुरुष जें काम ज्ञानपूर्वक करूं शकतो तें काम त्याचे अनुयायी श्रद्धेनें करूं शकतात कीं नाहीं ?" तेव्हां मीं उत्तर दिलें कीं "होय, करूं शकतात" आणि त्यावेळीं हनुमानाचें उदाहरण मीं सांगितलें. झालें. इतकें बोलणें झाल्यावर आमची मुलाखत संपली आणि मी परत आलों. त्यानंतर ९ ऑगस्टला बापूजी पकडले गेले. आतां तसें पाहिलें तर माझा आणि त्यांचा या बाबतींत कांहीं संकेत ठरला नव्हता. किंवा त्यांनीं उपवास सुरू

केला कीं मीं करायचा असें हि त्यांनीं सांगितलें नव्हतें. कोणत्या हि प्रकारें मी वचनबद्ध झालों नव्हतों. परंतु पकडले गेल्याबरोबर प्यारेलालजी बाहेर होते त्यांच्या हातीं बापूंनीं निरोप पाठविला कीं "विनोबाला सांग कीं इतक्यांत उपवास करायचा नाहीं." कारण त्यांना माहित होतें कीं आपल्याशीं चर्चा करून हा माणूस गेला आहे तेव्हां जेलमधें गेल्याबरोबर हा उपवास जरूर सुरू करील. त्यांनीं तशी आज्ञा जरी दिली नव्हती तरी जें काय त्यांनीं दिलें होतें तें आज्ञेपेक्षां हि अधिक दिलें होतें. मी पकडला गेलों त्या दिवशीं दादा हि माझ्याबरोबर होते. जेलमधें पाय ठेवतां च मी जेलरकडे गेलों आणि त्याला सांगितलें कीं 'मी जेलचे सर्व नियम पाळणारा मनुष्य आहे हें तुम्ही जाणतां. जेलमधें इतरांकडून नियमांचें पालन करवून घेण्याचें हि काम मी करतों आणि जेलरला खास कांहीं करावें च लागत नाहीं हें हि तुम्हीं जाणतां. परंतु या वेळीं तसें होणार नाहीं. सकाळचें माझें जेवण झालें आहे. परंतु संध्याकाळीं खाण्याचा प्रसंग येईल तेव्हां मी खाणार नाहीं. किती दिवस खाणार नाहीं तें हि मला माहीत नाहीं. परंतु तुमची शिस्त मोडण्यासाठीं मात्र मी हें करीत नसून माझी अंतरात्म्याची शिस्त पाळण्यासाठीं हें करीत आहें." एवढें बोलून मी माझ्या बराकींत गेलों. दोन तासांनीं मला बोलावणें आलें. बापूंनीं प्यारेलालजींना सांगितलेला संदेश त्यांनीं किशोरलालभाईंना कळविला. किशोरलालभाईंनीं तो डी. सी. ला कळविला. आणि निरोप विनोबांना सांगतां येईल का असें विचारलें. डी. सी. नें गव्हर्नरला विचारलें. त्यानें निरोप सांगूं देण्यास परवानगी दिली परंतु त्यापेक्षां एक अक्षर हि अधिक बोलणें होतां कामा नये असें बजावलें. डी. सी-

नें किशोरलालभाईंना सांगितलें कीं आम्ही निरोप पोंचवूं. तेव्हां किशोरलालभाई म्हणाले कीं तुमच्या सांगण्यानें काम होणार नाहीं. आमच्यापैकीं कुणीं सांगितलें पाहिजे. तेव्हां वाळुंजकरजी जेलमध्यें मला भेटण्यास आले आणि त्यांनीं बापूंचा निरोप मला सांगितला आणि त्यामुळें त्यावेळीं मीं उपवास केला नाहीं.

नंतर बापूंनीं २१ दिवसांचा उपवास सुरू केला तेव्हां मीं उपवास केला. तोंपर्यंत जास्तींत-जास्त सात दिवसांपेक्षां अधिक दिवसांचा उपवास मीं कधीं च केला नव्हता. परंतु या वेळीं उपवास सुरू झाले तेव्हां एक विलक्षण च अनुभव आला. पहिले २-४ दिवस तर असे च गेले. पण त्यानंतर उपवास चालला आहे याचा भास हि होत नव्हता. रात्रीं गाढ झोंप लागायची. दिवसा अध्ययन चालें. डॉ. महोदय त्यावेळीं माझ्याबरोबर होते. ते मालीश इत्यादि आपली जादू कांहीं करीत होते. तें मी करूं देत होतों. पण चित्त अत्यंत प्रसन्न होतें. उपवासाबद्दलचें ज्ञान बापूंजवळ होतें. मी फक्त श्रद्धेनें मान्य केलें होतें. ती मी त्यांची आज्ञा च समजलों होतों. आणि जितक्या आनंदानें बापू उपवास करीत होते त्यापेक्षां लेश-मात्र कमी आनंदाचा अनुभव मला नव्हता.

हें सगळें मीं एवढ्यासाठीं सांगितलें कीं श्रद्धेनें मनुष्य अत्यंत प्रेमपूर्वक आणि आनंदानें आपलें बलिदान करूं शकतो यांत मला मुळीं च शंका नाहीं. शंका असली तर ही जरूर होऊं शकते कीं ज्ञानपूर्वक एखाद्यानें आहुति देण्याचें ठरविलें तर एखादे वेळीं आपल्या ज्ञानामध्यें कांहीं दोष आढळून ज्ञानी पुरुषाचें मन च साशंक होईल. परंतु श्रद्धेनें जो मनुष्य आहुति द्यायला निघाला त्याच्या

चित्तांत शंका उत्पन्न होण्याचें कारण च नाहीं ! कारण त्यानें आज्ञेच्या आधारें वलिदान देण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें त्या-बद्दलची चिंता करण्याचें त्याला कारण च उरत नाहीं. आतां अशी आज्ञा कोणीं करायची आणि कोणाला करायची हा प्रश्न आहे.

परंतु कमांड घेण्यामधें विचारशासनापुरतें आज क्षेत्र मर्यादित असलें तरी पुढें तें इतर क्षेत्राला लागू होण्याची धास्ती आहे, वगैरे शंका काढून भिण्यांत सार नाहीं. अशा रीतीनें जीवनांत भीत-भीत वागण्यानें काम होणार नाहीं. गीता म्हणते कीं "**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता:**" सहज प्राप्त कर्म असलें तरी त्यांत दोष शिरतो. अग्नीबरोबर धूर असतो च. त्यामुळें प्रत्येक आरंभामधें धोका आहे, खतरा आहे. हा खतरा फक्त गुजराथी शब्दांत नाहीं. कारण गुजराथी भाषेंत प्रयोगाला 'अखतरा' म्हणतात. सांगण्याचा भावार्थ असा कीं श्रद्धेनें आज्ञेचें पालन होऊं शकतें. परंतु ज्ञान आज्ञेनें देतां येत नाहीं. अमुक अमुक ज्ञान तुला झालें पाहिजे अशी आज्ञा केल्यानें ज्ञान होत नाहीं. एखाद्याला एखादी वस्तु समजली नाहीं तर "मी आज्ञा करीत असून हि तुला समजत नाहीं !" असें म्हणतां येत नाहीं.

म्हणून सर्वोदयामधें विचाराच्या क्षेत्रामधें पूर्ण स्वातंत्र्य असतें. तें सर्वोदयाचें महत्त्वाचें लक्षण आहे. हिंसा-शक्तीमधें तावड-तोब एक समूह उभा करण्याची शक्ति असते तशी अहिंसेंत असली पाहिजे आणि त्यासाठीं अनुशासन, शिस्त इत्यादि पाहिजे असें माझें म्हणणें आहे. आदर्श स्थितींत तर अशा रीतीनें हिंसा फुटून निघण्याचा संभव च राहणार नाहीं हें हि मीं सांगितलें. परंतु आज

चारी बाजूला अशा हिंसक घटना घडत असतां हिंसक शक्तीनें हजारों माणसें एकत्र आणूं शकावें आणि अहिंसेंत तशी शक्ति नसावी असें झालें तर अहिंसा ही रक्षणकारी शक्ति बनणार नाहीं. जीवनांत थोडी गोडी आणण्यापुरता च तिचा उपयोग होईल.

एकानें प्रश्न विचारला आहे कीं "पंचविध निष्ठा मानणारे लोक-सेवक असतांना पुन: स्वतंत्र शांतिसेना असण्याची अवश्यकता काय ?" म्हणजे शांतिसेनेच्या विचारावर च आघात आहे. परंतु मला हें म्हणायचें आहे कीं कांहीं प्रसंग असे असतात कीं तिथें विलंब होऊन चालत नाहीं. 'वॉटर लू ची लढाई तूं कां हरलास ?' असें नेपोलियनला विचारण्यांत आलें तेव्हां तो म्हणाला कीं "माझ्या योजनेंत ठरल्यापेक्षां मार्शल ने हा सात मिनिटें उशीरां आल्यामुळें मी लढाई हरलों." वेळेचें असें महत्त्व असतें.

हें मीं सहज उदाहरण म्हणून सांगितलें. याचा अगदीं अक्षरश: अर्थ घेण्याची गरज नाहीं. परंतु लवकरांत लवकर अहिंसक समूह एकत्र आणण्याचे प्रसंग येत असतात. म्हणून कमांड शब्द वापरला. परंतु त्याचा सौम्यांत सौम्य अर्थ तुम्ही घेऊं शकतां.

• • •

# शांति-सेनेबाबत शंका-समाधान



[ मैसूर-शिबिर २७–९–५७ ]

[ सर्वोच्च सेनापतिपद आणि सेना-संघटना याबद्दल गुजराथच्या तरुण कार्यकर्त्यांनीं सकाळच्या खाजगी बैठकींत ज्या शंका उपस्थित केल्या होत्या त्याबाबतचा खुलासा सर्वांच्या च उपयोगाचा वाटल्यावरून शिबिराच्या जाहीर सभेंत त्याबाबत विनोबांचें पुनः भाषण झालें तें पुढें दिलें आहे. ]

शांति-सेनेच्या कल्पनेमध्यें परिपूर्ण कर्तृत्वविभाजन आहे. सबंध देशांत ७० हजार शांति-सैनिक असावेत, आणि ५ हजारांच्या लोकसंख्येला एक याप्रमाणें ते सर्वत्र त्या त्या विभागांत काम करीत असावेत, अशी कल्पना आहे. त्या ठिकाणीं कशा रीतीनें काम करायचें हें त्या सैनिकानें आपल्या बुद्धीनें ठरवायचें आहे. बाहेरून कुठून त्याला बुद्धीचा पुरवठा केला जायचा नाहीं. प्रत्येक शांति-सैनिक स्वतःला, शांतिसेनेच्या सिद्धांताला, आणि ज्या भागांत तो सेवा करीत असेल त्या समाजाला स्वतंत्र रीत्या जबाबदार राहील. अशा रीतीनें स्वतंत्र राहिल्याशिवाय त्या ठिकाणीं काम कसें करायचें हें त्याला सुचणार च नाहीं. प्रत्येक प्रसंगाच्या वेळीं तो प्रश्न विचारीत बसेल तर त्याचें उत्तर देणारा कुणी त्या त्या जागेवर असेल च असें नाहीं आणि तो उत्तर देऊं च शकेल असें हि नाहीं. म्हणून शांति-सैनिकाचें स्वतःच्या जबाबदारीवर पूर्ण कर्तृत्वविभाजन आपोआप च होणारें आहे. विचारशासन हें च फक्त त्याला मार्गदर्शक आहे. स्वतः विचार करून निरंतर सेवा-कार्यांत मग्न रहायचें, लोकांचा परिचय करून घ्यायचा, त्यांचीं

सुखदु:खें ओळखायचीं, त्यांच्या दु:खानें दु:खी आणि त्यांच्या सुखानें सुखी व्हायचें, स्वत:चें असें सुखदु:ख ठेवायचें नाहीं, आणि प्रसंग आला तर अत्यंत प्रेमपूर्वक, निर्वैरभावनेनें च केवळ नव्हे तर मातृवात्सल्याच्या भावनेनें आपलें बलिदान करण्यास तयार रहायचें, या शिवाय अन्य कोणतें हि शासन शांतिसैनिकाला नाहीं. यांत विचारशासन आणि कर्तृत्वविभाजन पूर्णपणें आहे.

हिंसक सेनेच्या योजनेंत असें नसतें. त्यांना एके ठिकाणीं ठेवण्यांत येतें, विशेष प्रकारचें शिक्षण दिलें जातें. त्यांना यंत्रवत् बनविण्यांत येतें. बुद्धींत भेद पडूं नये म्हणून बाहेरच्या कोणत्या हि विचारांचा स्पर्श त्यांना होऊं देत नाहींत. परंतु आपल्या सेनेंत असें नाहीं. जगांत जेवढे म्हणून विचार-प्रवाह आहेत आणि ज्यांचा समाजाच्या चित्तावर परिणाम होत असतो त्या सर्व विचारांचें, जागृत राहून, स्वतंत्र बुद्धीनें विश्लेषणपूर्वक चिंतन करणें प्रत्येक सेवकाचें कर्तव्य आहे. कोणता हि विचार ग्रहण करण्यास किंवा सोडण्यास तो सर्वथा मुक्त आहे. जगांतील घडामोडींचें पूर्ण ज्ञान त्याला नसेल तर ती त्याची अक्षम्य चूक समजली जाईल. जगांतील ज्ञानापासून त्याला वंचित ठेवण्याचा इथें प्रश्न नसून उलट जगांतील सर्व ज्ञानांशीं त्यानें परिचित राहिलें पाहिजे असें आहे.

असें असतांना मग कमांडची, आज्ञेची, बाब कुठें येते, असा प्रश्न उभा राहतो. एखाद्या क्षेत्रांत काम करणारा सेवक जेव्हां बाहेरच्या मदतीची अपेक्षा राखतो तेव्हां कमांडचा प्रश्न उत्पन्न होतो. त्याला जर मदतीची जरूर च वाटली नाहीं तर प्रश्न च

नाहीं. तो स्वत: च सरदार आहे. देशांत अशांतीची घटना घडली तर शांति स्थापनेची योजना ठिकठिकाणीं आहे च असा विश्वास देशाला वाटून देश निश्चित राहील. परंतु समजा कीं एखाद्या ठिकाणीं विशेष परिस्थितीमुळें बाहेरच्या मदतीची जरूर भासली तर त्या ठिकाणीं लवकरांत लवकर मदत पोंचविण्याची योजना झाली पाहिजे. बाहेरून मदतीला जाणारे हे लोक श्रद्धापूर्वक जाणारे असले पाहिजेत. दुसऱ्याच्या कार्यक्षेत्रांत गेल्या-नंतर आपल्या चिकित्सक बुद्धीचा तुम्ही उपयोग करतां कामा नये हें मी स्पष्ट करूं इच्छितों. कारण तुम्ही तिथल्या स्थानिक सेवकाला मदत करण्यास जात आहांत. अशा स्थितींत त्याला अनुकूल होणें आणि त्याची कमांड (आज्ञा) मानणें अत्यंत जरुरीचें आहे. म्हणून मदतीला जाणारे हे लोक श्रद्धाळु असले पाहिजेत असें मीं म्हटलें. अशा रीतीनें एक आदेश देऊन दुसऱ्या क्षेत्रांत मदतीसाठीं सेवक पाठविणारी एखादी एजन्सी असली पाहिजे. ही एजन्सी एका व्यक्तीची असली तर अधिक श्रद्धास्पद असते, कीं एका समूहाची असली तर अधिक श्रद्धास्पद असते या गोष्टीचा निर्णय अजून मानवाला करायचा उरला आहे.

"वीर-पूजा होतां कामा नये" असें पुष्कळ वेळां बोललें जाते. परंतु अवीर-पूजा कधीं च होऊं शकत नाहीं. वीरपूजा होऊं नये हें बोलणें तोंपर्यंत च चालतें जोंपर्यंत एखादा वीर पुरुष समोर उभा होत नाहीं. आम्हीं खुशाल ऐट मारावी कीं आम्ही निर्गुणपूजक आहोंत, सगुणपूजक नाहीं. परंतु सगुणाचा साक्षात्कार होत नाहीं तोंपर्यंत च ही ऐट चालते. अशी एखादी

सगुणमूर्ति समोर उभी झाली असतां ज्याचें मस्तक नमलें नाहीं असा एक हि निर्गुणवादी मीं पाहिला नाहीं किंवा ऐकला नाहीं. प्रत्येक क्षेत्रांत हें असें होतें. म्हणून वीरपूजेचें भय बाळगण्याचें मुळीं च कारण नाहीं. भय आहे अवीरपूजेचें. आणि जिथें समूहाची योजना होत असते तिथें अवीरांचें महत्त्व उगीच च वाढतें. निवडणुका होतात. निवडणुकीची तऱ्हा हि अशी असते कीं खरीं लायक माणसें निवडणुकीपासून दूर राहतात; जे लायक नसतात ते निवडले जातात.

म्हणून एखाद्या श्रद्धेय व्यक्तीवर भरंवसा ठेवून चालावें कीं समूह-योजनेवर भरंवसा ठेवून चालावें याचा निर्णय समाजाला अजून करायचा बाकी आहे असें मीं म्हटलें. सामूहिक योजनेनें एखादा निर्णय झाला तर विशेष स्फूर्ति येते असें असेल तर उत्तम च आहे. इतकी व्यक्तिनिरपेक्षता खरोखर आमच्यांत येत असेल तर चांगलें च आहे. विचार विरुद्ध व्यक्ति असा प्रश्न असेल तिथें विचार च प्रधान असला पाहिजे, व्यक्तीचें विशेष महत्त्व च नाहीं हें बरोबर आहे. परंतु समजा कीं एका बाजूला विचारयुक्त व्यक्ति आहे आणि दुसऱ्या बाजूला व्यक्तिहीन विचार आहे तर मग आपण स्वतः देहधारी असल्यामुळें विचारयुक्त व्यक्ति ही च अधिक श्रद्धेय ठरते. निदान अजून तरी समाजाची तशी स्थिति आहे. पुढें जेव्हां सर्वत्र निष्ठा पसरेल आणि एकमेकांशीं विचार-विमर्ष करण्याची हि गरज राहणार नाहीं अशी स्थिति येईल तेव्हां कदाचित् समाज व्यक्तिनिरपेक्ष राहूं शकेल. परंतु बुद्ध-धर्मांत देखील "**बुद्धं शरणं गच्छामि**" येथून च सुरवात होते.

हें लक्षांत घ्यायला हवें कीं. बुद्धि बलवान असली तरी एखादा बिंदु असा येऊन पोंचतो कीं जिथें बुद्धि काम करीत नाहीं, श्रद्धा च काम करते. हें श्रद्धा-तत्त्व बुद्धीच्या विरुद्ध नसून बुद्धीला मदतरूप असतें. अमृतानुभवांत गुरूच्या स्वरूपाचें वर्णन करतांना ज्ञानदेवानें लिहिलें आहे **"आतां उपाय-वन-वसंतु। आज्ञेचा अहेव तंतु."** गुरु हा उपायरूपी—साधनारूपी—वनाचा वसंतऋतु आहे. वसंतऋतु आला म्हणजे ज्या प्रमाणें सारें वन प्रफुल्लित होतें, त्या प्रमाणें गुरु असल्यावर शिष्याला साधना करावी लागत नाहीं. साधनेचा उत्कर्ष आपोआप त्या ठिकाणीं होतो. केवळ गुरु-दर्शनानें साधनारूपी वन प्रफुल्लित होतें. हें झालें गुरूचें एक वर्णन. आणि पुढें ज्ञानदेव म्हणतात कीं **"गुरु आज्ञेचा अहेव तंतु आहे."** आज्ञा शब्द स्त्रीलिंगी असल्यामुळें तिला स्त्री मानली तर गुरु हा तिचा पति आहे आणि तो तिचा अहेव म्हणजे सौभाग्य-तंतु आहे. ज्ञानदेवाची भाषा जुनी असल्यामुळें जुन्या दृष्टीनें च या वचनाकडे पाहिलें पाहिजे. गुरु नसेल तर आज्ञा विधवा होते असें त्यानें म्हटलें. याचा अर्थ असा कीं जगांत आज्ञा फक्त एका गुरूची च चालूं शकते. गुरूच्या ठिकाणीं ज्ञान असतें, प्रेम असतें, आणि सत्ता मुळीं च नसते. परंतु सत्य असतें. त्यामुळें ज्ञान, प्रेम, आणि सत्य या गोष्टी जिथें एकत्र होतात तिथें आज्ञा मुळीं च टाळली जाऊं शकत नाहीं. जगांत आज्ञा केवळ गुरूच्या आधारावर सौभाग्यवती असते. कोणत्या हि सरकारच्या कायद्याचें किंवा कोणत्या हि सेनापतीच्या हुकुमाचें इतक्या तत्परतेनें पालन होत नसेल जितकें गुरूच्या वचनांचें होतें. म्हणून मनुष्याला आत्मोत्सर्ग करण्याची प्रेरणा समूहापेक्षां एखाद्या श्रद्धेय व्यक्तीमुळें अधिक

होत असते. म्हणून व्यक्तीचें नांव घ्यायचें इतकें च. यापेक्षां आज्ञेचा अधिक अर्थ शांतिसेनेमधें अभिप्रेत नाहीं.

यावर अशी शंका घेतली जाते कीं एकदां आज्ञेची संवय लागली कीं जीवनाच्या अन्य क्षेत्रांत हि तिचा स्पर्श होण्याची धास्ती असते. आतां विचार करा कीं एखाद्याला जर सांगितलें कीं नदींत पोहतांना पालथें पडावें लागतें, उभें रहायचें नसतें; तर पालथें पडण्याची संवय झाल्यामुळें तो किनाऱ्यावर आला असतां हि पालथा च पडून राहील असें होईल का? पालथें पडण्याचें विधान नदीपुरतें च मर्यादित आहे, किनाऱ्यावर आलें असतां उभें रहायचें असतें. जीवनांत जो नेहमीं स्वतंत्र चिंतनपूर्वक वागत असतो तो च शांतिसेनेंत उत्तम आज्ञापालन करूं शकतो. जो इतका जड आणि गुलाम बनला असेल कीं स्वतंत्र चिंतन न करतां पदोपदीं मस्तक च नमवीत असेल तो शांतिसेनेच्या आज्ञेचें यथार्थ पालन करूं च शकणार नाहीं. सर्वांपुढें नमणारें मस्तक ईश्वरापुढें कधीं च नमणार नाहीं. ज्याला गुलामीची संवय जडली असेल तो ऐन प्रसंगाच्या वेळीं आज्ञेचें पालन करण्यास असमर्थ ठरेल. अमुक ठिकाणीं जाऊन शांतिस्थापना करण्याची आज्ञा तुम्हांला झाली तर त्याचा अर्थ तिथें जाऊन मरून जा असा थोडा च आहे? आपल्या बुद्धीचा पूर्ण उपयोग करून, शांति प्रस्थापित करून जिवंत परत या, असा त्याचा अर्थ आहे. तें करूं न शकलांत आणि शांति-स्थापनेच्या प्रयत्नांत स्वत:चें बलिदान करावें लागलें तर तें हि करायची तयारी ठेवायची आहे. तिथें जा आणि जवळची एखादी नदी पाहून बुडून मरा असा आदेश तुम्हांला नाहीं दिला जायचा.

तुम्हांला त्या ठिकाणीं जाऊन आपल्या बुद्धीची आणि स्वतंत्र विचाराची पराकाष्ठा करावी लागेल. तुम्हांला प्रत्युत्पन्नमति बनावें लागेल. तुमच्या कर्मकुशलतेची कसोटी त्या ठिकाणीं लागणार आहे.

म्हणून शब्दानें घाबरून जाऊं नका. भाषा ही विचार समजावून सांगण्यापुरती असते. कमांड शब्दानें बिचकण्याचें कारण नाहीं. येशू ख्रिस्तानें कमांड शब्दाचा उपयोग करून म्हटलें कीं "**मी आतां तुम्हांला अंतिम आज्ञा देतों**" कोणती आज्ञा? तर म्हणे "**एकमेकांवर प्रेम करा.**" भावार्थ असा कीं ही सारी परिभाषा प्रेमाची आहे. म्हणून च कालच्या व्याख्यानांत मीं नानकाचें वचन तुम्हांला सांगितलें "**हुक्म रजाई चल्लणा**" हुक्म शब्द त्यानें वापरला. परमेश्वराचा हुकूम. एक स्थिति अशी येते कीं जेव्हां गुरु, सत्य, परमेश्वर हे सारे शब्द पर्यायवाची बनतात. त्यांत भेद राहत नाहीं. आणि अशी निष्ठा जेव्हां बनते तेव्हां च मनुष्य स्वतःला वणव्यांत झोकूं शकतो. म्हणून शांतिसेनेमधें विचार-स्वातंत्र्याला कुठें च बाध येत नाहीं आणि रेजिमेंटेशनचा हि प्रश्न नाहीं.

ठिकठिकाणीं पुढारी नेमण्याची गरज नाहीं. परंतु ठिक-ठिकाणीं मार्गदर्शक गुरु उपलब्ध असले तर ती आनंदाची गोष्ट आहे. एक कोश तुमच्यापाशीं पडला आहे. जरूर वाटेल तेव्हां शब्द त्यांत पाहूं शकतां. कोणता शब्द वापरावा हें डिक्शनरी तुम्हांला सांगत नाहीं. परंतु अमुक एका शब्दाबाबत शंका असेल तिथें डिक्शनरी मदत करायला तयार आहे. शांतिसेनेमधें सेनापति

तुम्हांला “अमुक ठिकाणीं जा” एवढी च आज्ञा करण्यापुरता आहे. बाकीचें सर्व तुम्हांला तुमची बुद्धि वापरून करायचें आहे. कोणी जर असें समजून शांतिसैनिक बनत असेल कीं आतां विचार करण्याची तकलीफ नाहीं, बाबा आज्ञा देत जाईल त्याप्रमाणें वागायचें, तर तो शांतिसेनेचें मर्म च समजला नाहीं असें म्हटलें पाहिजे. तुम्हांला हनुमानाप्रमाणें एकाकी पाठविलें जाणार आहे. तुलसीदासांनीं एका प्रसंगांत हनुमानाचें वर्णन केलें आहे कीं तो “**अति लघु रूप धरि**” आंत शिरून बाहेर पडला. मूळचें त्याचें रूप विशाल. परंतु प्रसंग पाहून त्यानें लघु रूप धारण केलें. प्रसंगी असें लघुरूप धारण करणें हें बुद्धीचें लक्षण आहे. अशी बुद्धि आपल्यांत असली पाहिजे. मग बिभीषण पाहून तिथें पाय रोंवतां येतो. अशा रीतीनें शांतिसेनेची सारी प्रक्रिया ही हनुमंताची प्रक्रिया आहे.

म्हणून शांतिसैनिकाला कुशलता आणि बुद्धिमत्ता वापरावी च लागेल. परंतु समोरच्या माणसाच्या बुद्धीवर जडतेचा दाट पडदा आलेला असेल तर त्यावेळीं केवळ बुद्धीनें काम भागणार नाहीं. आणि प्राणार्पण करण्याची जरूर पडेल तर तें हि करायचें आहे. अशा प्राणार्पणांत स्थूल फळ पदरांत पडेल कीं नाहीं याची चिंता आपण करायची नाहीं. परमेश्वराच्या योजनेंत त्याचें फळ जरूर मिळणार आहे. परंतु मुख्य गोष्ट ही आहे कीं “केवळ” बलिदान कामाचें नाहीं. “शुद्ध” बलिदान हवें.

समाप्त

ग्रंथ संग्रहालय,
२८.१२० ..... दि: ......

REFBK-0009302

